महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरूद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन : मुंबईसह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, जालना, नाशिक

MHCrimeTimes MAHCrimeTimes 9803386748 maharashtracrimetimes@gmail.com

www.maharashtracrimetimes.com epaper.maharashtracrimetimes.com

मूल्य ₹ २/-

• संपादक : राकेश शंकर गोरे • वर्ष : १७ अंक : १० पृष्ठ : ८ मंगळवार ०९ जून २०२६ ते सोमवार १५ जून २०२६ • POSTAL REG.NO. MCN/157/2026-2028 • PRGI. REG. NO. MAHMAR/2010/33301

# मान्सून अखेर महाराष्ट्रात धडकला!

## तळकोकणात मोसमी वाऱ्यांचे दमदार आगमन

**पुणे (अभिजीत येरल्लू) : मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र, त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर; तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे. सध्याच्या हवामान अंदाजानुसार, किमान १५ जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खान्देश आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तथापि, हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती अद्याप दिसत नाही. दरम्यान, किमान १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे.**



विदर्भ व खान्देशात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात ३५ ते ४० अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. कृषी व आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून शेतकरी व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. त्यानुसार आगामी वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये, विजांच्या कडकडाटाच्या वेळी झाडाखाली, टिनशेडखाली; तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ थांबणे टाळावे, असे आवाहन कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना करण्यात करण्यात आले आहे. नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांचा वेग किंचित मंदावल्याने गेल्या २४ तासांपासून ते तळकोकणात मुक्कामी आहेत. हे वारे संपूर्ण राज्य व्यापण्यासाठी जूनचा दुसरा आठवडा उजाडणार आहे. त्यामुळे मोठा पाऊस पुढील आठवड्यानंतरच राज्यात दिसेल, असा अंदाज शास्त्रज्ञांनी वर्तवला. नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांनी रविवारी ईशान्य भारत आणि बंगालच्या उपसागरात आगेकूच केली. हे वारे आता मिझोराम, मणिपूर, नागालँड ही राज्ये, याशिवाय त्रिपुरा, मेघालय, आसाम आणि अरुणाचल प्रदेशचा काही भाग व्यापत आहेत. महाराष्ट्रात मात्र मोसमी वाऱ्यांच्या स्थितीत बदल झालेला नाही. वाऱ्यांची उत्तरेची सीमा देवगडमधून जात आहे. पुढील तीन-चार दिवसांत मोसमी वारे महाराष्ट्रात इतर ठिकाणी आगेकूच करण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

▶ पान २ वर

## संक्षिप्त

### राज्यात १५ जूनपासून वाजणार शाळांची घंटा!

**मुंबई :** राज्य मंडळाच्या (SSC/HSC) प्राथमिक, माध्यमिक शाळा तसेच ज्युनिअर कॉलेजेसचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सोमवार, १५ जूनपासून सुरू होणार असून मुंबईतील सर्व शाळा नियोजित वेळेनुसार नियमितपणे भरतील. यंदा विदर्भातील काही भागांमध्ये उष्णतेच्या तीव्रतेमुळे शालेय वेळांमध्ये तात्पुरते बदल करण्यात आले असले, तरी मुंबईसाठी अशा कोणत्याही बदलाची घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे शहरातील शाळा सकाळ किंवा दुपारच्या नियमित सत्रांनुसारच सुरू राहतील. शिक्षण विभागाने यंदाही प्रत्यक्ष वर्गांवर भर दिला असून शाळांमध्ये पूर्णपणे ऑफलाईन पद्धतीने अध्यापन होणार आहे. ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय उपलब्ध नसणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, मान्सूनपूर्व पावसाचा अंदाज लक्षात घेऊन शाळा प्रशासनांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नव्या शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर शालेय वाहतुकीच्या खर्चातही वाढ होण्याची शक्यता असून मुंबई स्कूल बस असोसिएशनने बसभाड्यात सुमारे १५ टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते, असे संकेत दिले आहेत.

### लहान शहरांतून गायब होणार एटीएम सेवा?

**नवी दिल्ली :** टियर-२ आणि टियर-३ शहरांतील अनेक एटीएममध्ये रोख रकमेची कमतरता निर्माण होण्याची शक्यता असल्याचा इशारा एटीएम उद्योग संघटना CATMi ने दिला आहे. संघटनेच्या मते, लहान शहरे आणि ग्रामीण भागात एटीएममध्ये वेळेवर रोख रक्कम पोहोचत नसल्याने काही ठिकाणी सेवा प्रभावित होऊ शकते. वाढते इंधन खर्च, परिचालन खर्च आणि डिजिटल व्यवहारांमुळे एटीएम ऑपरेटरांवर आर्थिक दबाव वाढला आहे. मात्र, देशात रोख रकमेचा तुटवडा नसल्याचे RBI ने स्पष्ट केले आहे. समस्या केवळ काही भागांतील रोख वितरणाशी संबंधित असून आवश्यकतेनुसार पुरेसा चलनसाठा उपलब्ध करून दिला जाईल, असेही सांगण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरण्याची गरज नसल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# भारत-इस्रायल मैत्रीचे नवे पर्व!

## इस्त्रायलच्या भूमीवर उभारणार छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा!

**वृत्तसंस्था :** महाराष्ट्रातील जनतेसाठी अभिमानाची बातमी समोर आली आहे. इस्रायलमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याची घोषणा मुंबईतील इस्रायलच्या वाणिज्य दूतावासाने 'शिवराज्याभिषेक दिना'च्या निमित्ताने केली आहे. ६ जून १६७४ रोजी झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधत हा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करण्यात आला. मुंबईतील इस्रायलचे कॉन्सुल जनरल यानीव रेवाच यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महान वारशाला साजेसे स्मारक उभारण्यासाठी महाराष्ट्र सरकारचे सहकार्य मागण्यात आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. फडणवीस यांना



पाठविलेल्या पत्रात रेवाच यांनी नमूद केले आहे की, इस्रायलमध्ये उभारण्यात येणारा शिवाजी महाराजांचा पुतळा हा भारत आणि इस्रायल यांच्यातील दृढ मैत्रीचे प्रतीक ठरेल. महाराष्ट्र आणि भारतीय ज्यू समाज यांच्यातील ऐतिहासिक संबंध लक्षात घेता या स्मारकाला विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे. भारतीय ज्यू समाजातील अनेकांचे वंशज आज इस्रायलच्या सामाजिक आणि राष्ट्रीय विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. स्मारकाच्या उभारणीसाठी ऐतिहासिक संदर्भ, कलात्मक मार्गदर्शन, रचना आणि अन्य तांत्रिक बाबींमध्ये महाराष्ट्र सरकारचे सहकार्य अपेक्षित असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यानीव रेवाच यांनी सांगितले की, पुढील टप्प्यात हा प्रकल्प लोकसहभागातून राबविण्याचा विचार असून त्यामुळे दोन्ही देशांतील जनतेमधील मैत्री आणखी दृढ होईल. धैर्य, नेतृत्व, सुशासन आणि परस्पर आदर या महाराष्ट्र आणि इस्रायलच्या सामायिक मूल्यांना ही एक कायमस्वरूपी मानवंदना ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ऐतिहासिक इस्रायल दौऱ्यानंतर दोन्ही देशांतील लोकांमधील संबंध अधिक मजबूत करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले असून त्याचाच एक भाग म्हणून हा प्रकल्प साकारला जात आहे.

▶ पान २ वर

# FDA मध्ये तुकाराम मुंढेंची कडक शिस्त

## नागरिकांसाठी थेट तक्रार निवारण यंत्रणा सुरू

**मुंबई (सम्यक कासारे) :** अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागावर गेल्या काही महिन्यांपासून भ्रष्टाचार आणि अनियमिततेचे आरोप होत होते. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने २५ मे रोजी आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याकडे विभागाची जबाबदारी सोपवली. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कडक शिस्त आणण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे. सार्वजनिक आरोग्याशी संबंधित प्रश्नांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच बेकायदेशीर कारवायांवर लगाम घालण्यासाठी त्यांनी थेट नागरिकांच्या सहभागाला प्राधान्य दिले आहे. विभागाच्या कामकाजात अधिक पारदर्शकता निर्माण करण्याबरोबरच तक्रारींवर तातडीने कारवाई करण्यासाठी स्वतंत्र संपर्क यंत्रणा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना त्यांच्या परिसरात सुरू असलेल्या गैरप्रकारांची माहिती थेट प्रशासनापर्यंत पोहोचविणे अधिक सुलभ होणार आहे.भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे तसेच




प्रतिबंधित गुटखा आणि पान मसाल्याच्या विक्रीबाबत नागरिक आता थेट एफडीए आयुक्तांकडे तक्रार नोंदवू शकतात. यासाठी विभागाने 1800-222-365 हा टोल-फ्री हेल्पलाईन क्रमांक आणि jc-foodhq@gov.in हा अधिकृत ई-मेल आयडी जाहीर केला आहे. या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाणार असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे. सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती, संस्था किंवा व्यावसायिकांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

▶ पान २ वर

# १५ ऑगस्टपासून एअर इंडिया इमारतीतून चालणार राज्याचा कारभार!

**मुंबई (विशाल कारंडे) :** नरिमन पॉईंट येथील ऐतिहासिक एअर इंडिया इमारत महाराष्ट्र सरकारच्या ताब्यात आल्यानंतर या वास्तूमध्ये शासकीय तसेच मंत्री कार्यालयांचे स्थलांतर करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. याआधी इमारतीची संरचनात्मक तपासणी करण्यात येणार असून त्यानंतरच कार्यालयांचे स्थलांतर आणि प्रत्यक्ष कामकाज सुरू होईल. इमारतीबाहेरील एअर इंडियाचा फलक हटवून त्याजागी महाराष्ट्र शासनाचा फलक लावण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी बुधवारी इमारतीची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. इमारतीची डागडुजी, अंतर्गत सुशोभीकरण आणि तांत्रिक सुविधांचे आधुनिकीकरण



उच्च दर्जाने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. विद्युत यंत्रणा, फिटिंग्ज आणि इतर आवश्यक सुविधांसाठी दर्जेदार साहित्याचा वापर करण्यावर भर देण्यास सांगण्यात आले आहे. तसेच भारताच्या स्वातंत्र्यदिनापासून, म्हणजेच १५ ऑगस्टपासून, या इमारतीत प्रत्यक्ष शासकीय कामकाज सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

▶ पान २ वर

# वडापाव पॅकिंगसाठी वर्तमानपत्र वापरण्यास मनाई! - एफएसएसएआयचे कडक निर्देश

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** मुंबईतील एका प्रसिद्ध वडापाव विक्रेत्याकडून अन्नपदार्थ पॅक करण्यासाठी आणि वाढण्यासाठी वर्तमानपत्राचा वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण (एफएसएसएआय) आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी संयुक्तपणे कारवाई सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर एफएसएसएआयच्या पश्चिम विभागाने नवीन निर्देश जारी करत अन्नपदार्थांच्या पॅकिंगसाठी किंवा थेट संपर्कात येणाऱ्या कोणत्याही कारणासाठी वर्तमानपत्रांचा वापर तातडीने बंद करण्याचे आदेश दिले आहेत. शहरात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी सर्व खाद्यपदार्थ विक्रेत्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. छपाईच्या शाईमध्ये





शिसे आणि इतर जड धातूंसह विविध हानिकारक रसायने असतात. ही रसायने अन्नपदार्थांमध्ये मिसळून दीर्घकालीन आरोग्यविषयक समस्या निर्माण करू शकतात. तसेच वितरण आणि हाताळणीदरम्यान वर्तमानपत्रे अस्वच्छ होत असल्याने ती रोगजंतूंचे वाहक ठरू शकतात, असा इशाराही प्राधिकरणाने दिला आहे. अन्न सुरक्षा आणि मानके (पॅकेजिंग) नियम, २०१८ नुसार अन्न साठवण्यासाठी, गुंडाळण्यासाठी किंवा वाढण्यासाठी वर्तमानपत्र अथवा तत्सम साहित्याचा वापर करण्यास सक्त मनाई आहे. त्यामुळे रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेते, रेस्टॉरंट्स, क्लाउड किचन्स, केटरर्स, क्विक सर्व्हिस रेस्टॉरंट्स, किरकोळ विक्रेते, फेरीवाले आणि इतर सर्व खाद्य व्यवसायांनी अन्नपदार्थांवर प्रक्रिया करताना किंवा विक्रीदरम्यान कोणत्याही टप्प्यावर वर्तमानपत्रांचा वापर करू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. अतिरिक्त तेल शोषण्यासाठी, अन्न झाकण्यासाठी किंवा पॅकिंगसाठीही वर्तमानपत्र वापरण्यास मनाई करण्यात आली आहे.

▶ पान २ वर

# देशातील खाद्यतेल विक्रीबाबत केंद्र सरकारचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** देशातील खाद्यतेल विक्रीबाबत मोदी सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. खाद्यतेलाची विक्री आता ठरावीक वजनाच्या पॅकमध्येच कंपन्यांना करावी लागणार आहे. यासाठी २०० मिली ते २० लिटर अशी वजनाची नऊ परिमाणे निश्चित करण्यात आली आहेत. केंद्रीय ग्राहक कामकाज विभागाने ही नियमावली लागू केली असून, यामुळे ग्राहकांना अधिक पारदर्शकपणे खाद्यतेलाची खरेदी करता येणार आहे. या नियमावलीच्या अंमलबजावणीसाठी खाद्यतेल उत्पादक कंपन्यांना तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. सध्या बाजारात कंपन्यांकडून विविध वजनांच्या पॅकमध्ये



खाद्यतेलाची विक्री सुरू आहे. मात्र, प्रत्येक कंपनीच्या पॅकचे वजन वेगवेगळे असते. त्यातून ग्राहकांना आपल्याला नेमके कोणत्या कंपनीचे खाद्यतेल स्वस्त मिळत आहे, हेच कळत नाही. कारण हे पॅक एकसारखे दिसणारे असतात. या बाबत ग्राहकांकडून सरकारकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर सरकारने खाद्यतेलाच्या ठरावीक वजनाच्याच पॅकची विक्री करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यावर सरकारने देशातील खाद्यतेल उद्योग क्षेत्राचे सुमारे ९० टक्के प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रमुख उद्योग संघटनांशी चर्चा केल्यानंतर खाद्यतेलाची विक्री ठरावीक वजनाच्या पॅकमधून करण्याची नियमावली लागू केली आहे. या नवीन नियमावलीमुळे ग्राहकांना ठरावीक वजनाच्या पॅकमध्ये खाद्यतेल मिळणार आहे. त्यात प्रमुख खाद्यतेले आणि संमिश्र तेलांचा समावेश आहे. खाद्यतेलाच्या पॅकसाठी वजनाची नऊ परिमाणे निश्चित करण्यात आली आहेत. त्यात २०० मिली, ५०० मिली, १ लिटर, २ लिटर, ३ लिटर, ४ लिटर, ५ लिटर, १५ लिटर आणि २० लिटरचा समावेश आहे.

▶ पान २ वर

### नवीन नियमावली

- खाद्यतेल व संमिश्र तेलांसाठी ठरावीक वजनाचे पॅक
- पॅकवर वजन आणि आकारमान बंधनकारक
- देशांतर्गत उत्पादितसोबत आयात खाद्यतेलांसाठीही नियम लागू
- उत्पादकांना अंमलबजावणीसाठी तीन महिन्यांचा कालावधी
- दोन उत्पादनांच्या किमतीतील तुलना ग्राहकांसाठी अधिक सोपी

# बीकेसीत दर शुक्रवारी 'सार्वजनिक वाहतूक दिन'

## एमएमआरडीएचा पर्यावरणपूरक उपक्रम

**मुंबई (राकेश गायकवाड) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक वाहतूक वापराच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए)ने 'साप्ताहिक सार्वजनिक वाहतूक दिन' उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) येथे दर शुक्रवारी सार्वजनिक वाहतूक दिन साजरा केला जाणार आहे.



या दिवशी बीकेसीमध्ये येणाऱ्या आणि जाणाऱ्या नागरिकांनी मेट्रो, उपनगरीय रेल्वे आणि बससारख्या सार्वजनिक वाहतूक सुविधांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

▶ पान २ वर

संपादकीय

संपादक : राकेश शंकर गोरे

# महसुलाचा महाल की आकड्यांचा मायाजाल?

भारतीय भांडवली बाजारात विश्वास हा सर्वांत मोठा भांडवल मानला जातो. मात्र 'राजेश एक्स्पोर्ट्स' प्रकरणाने हा विश्वासच डळमळीत करण्याची शक्यता निर्माण केली आहे. कंपनीचे प्रवर्तक राजेश मेहता यांची तुलना आजच हर्षद मेहता किंवा केतन पारेख यांच्याशी करणे योग्य ठरणार नाही. परंतु बाजार नियामक सेबीने व्यक्त केलेल्या शंका आणि समोर आलेले आर्थिक तपशील पाहता हे प्रकरण गंभीर असल्याचे स्पष्ट होते. १९८९ मध्ये स्थापन झालेली 'राजेश एक्स्पोर्ट्स' ही कंपनी मूळतः सोन्या-चांदीच्या व्यापाराशी संबंधित आहे. पुढे कंपनीने विविध क्षेत्रांत विस्तार केला आणि केंद्र सरकारच्या उत्पादन-संलग्न प्रोत्साहन (पीएलआय) योजनेअंतर्गत बॅटरी निर्मितीसाठीही प्रोत्साहन मिळवले. त्यामुळे ही कंपनी वेगाने वाढणाऱ्या भारतीय उद्योगविश्वाचे प्रतीक मानली जात होती. अशा कंपनीबाबत सेबीला इशारा द्यावा लागणे हेच चिंतेचे कारण आहे. सेबीच्या अंतरिम अहवालानुसार, कंपनीने गेल्या पाच वर्षांत सुमारे १५ लाख ४० हजार कोटी रुपयांचा महसूल दाखवला आहे. मात्र या महसुलातील तब्बल ९९ टक्के व्यवहारांची विश्वसनीयता संशयाच्या भोवऱ्यात असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. सामान्य भाषेत सांगायचे तर महसुलाचा मोठा भाग पडताळणीअभावी प्रश्नांकित ठरतो. अशा परिस्थितीत कंपनीच्या आर्थिक स्थितीचे वास्तव चित्र काय, हा मूलभूत प्रश्न निर्माण होतो. अद्याप राजेश मेहता या व्यक्तीस हर्षद मेहता वा केतन पारेख आदी महानुभावांच्या रांगेत बसवणे कदाचित अयोग्य ठरेल. तथापि त्यांच्या 'राजेश एक्स्पोर्ट्स' या आस्थापनेच्या ताळेबंदाचे जितके काही तपशील समोर आले आहेत ते कोणाही किमानअकली इसमाचे डोळे विस्फारण्यास आणि मेंदू चक्रावण्यास पुरेसे ठरतील. त्यावरून हे सद्गृहस्थ कोणत्या मार्गाने भरधाव निघालेले आहेत याचा अंदाज बांधता येतो. आपल्या भांडवली बाजाराची नियंत्रक यंत्रणा 'सेबी' काही आडमार्गी धडाडी दाखवणाऱ्या उद्योगांस वेसण घालण्यासाठी प्रसिद्ध आहे असे नाही. 'वाईट पाहू नये, वाईट ऐकू नये आणि वाईट बोलू नये' या सल्ल्याच्या पालनासाठी ओळखल्या जाणाऱ्या आणि साधारणपणे स्थितप्रज्ञ म्हणवून घेण्यास पात्र अशा या 'सेबी'नामे नियंत्रकावर राजेश एक्स्पोर्ट्सविषयी इशारा देण्याची वेळ आली यावरून प्रकरण वाटते त्यापेक्षाही अधिक गंभीर आहे हे ताडता येईल. ही बाजारात सूचिबद्ध कंपनी. स्थापना १९८९ आणि मूळ उद्योग सोन्या-चांदीचे व्यवहार. अशा या कंपनीस अलीकडेच केंद्र सरकारच्या बहुप्रतिष्ठित उत्पादकता-आधारित-अनुदान (प्रॉडक्टिव्हिटी लिंक्ड इन्सेंटिव्हज) योजनेंतर्गत बॅटरी निर्मितीसाठी उत्तेजनही मिळाले. अशा तऱ्हेने आपल्या देशात वेगाने प्रगतीसाठी जे काही लागते ते सर्व चोख असलेल्या या कंपनीबाबत इशारा देण्याची गरज वाटून तशी हिंमतही 'सेबी'ने दाखवली, हे विशेष. दुसरे असे की या कंपनीत भारतीय आयुर्विमा महामंडळाची – 'एलआयसी'ची- मोठी गुंतवणूक आहे. म्हणून हे प्रकरण अधिकच गंभीर. त्याची दखल घ्यायलाच हवी. या कंपनीने गेल्या पाच वर्षांत तब्बल १५ लाख ४० हजार कोटी रु. इतका अगडबंब महसूल 'दाखवला' असला तरी त्यातील ९९ टक्के अतिरंजित असल्याचे 'सेबी' नमूद करते. जनसामान्य यास 'बोगस' असे संबोधतात. एखाद्या कंपनीच्या महसुलातील ९९ टक्के रक्कम संशयास्पद असेल तर मग उरलेल्या एक टक्क्यात राहिले काय? बरे, हे महान सत्य आपल्या 'सेबी'स गवसले कधी? तर या कंपनीच्या एका समभागधारकाने तक्रार केली तेव्हा. ही तक्रार कधी केली? २०२४ सालच्या मार्च महिन्यात. त्या वेळी 'सेबी'चे नेतृत्व करत होत्या माधवी पुरी बुच. त्याही वेळी त्यांच्या नाकाखाली काही बड्या सरकार-धार्जिण्या 'अ'द्योगपतींच्या बाजार विस्ताराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले होते. त्याही बाबत सर्व काही आलबेल असल्याचा अहवाल या बुचबाईंनी दिला, हे सर्वश्रुत आहेच. तथापि 'राजेश एक्स्पोर्ट्स'बाबत चौकशी करण्याची बुद्धी या नियामकास झाली आणि दोन वर्षे उलटून गेल्यावर या कंपनीचा व्यवहारच संशयास्पद असल्याचा निष्कर्ष 'सेबी'ने काढला. पण तोही अंतरिम. म्हणजे प्रत्यक्ष अहवाल दोन वर्षांनंतरही आलेला नाहीच. तो आल्यास कधी येईल आणि कसा येईल याबाबत शंका असणे सद्य:स्थितीत गैर नाही. सेबीचा अंतिम अहवाल अंतरिम अहवालाच्या बरोबर उलट नसेलच असेही सांगणे अवघड. त्यामुळे या अंतरिमाच्या आधारावर या सगळ्या प्रकाराचा विचार करावा लागणार. तो करण्यासाठी 'सेबी'ने या कंपनीकडे फक्त दोन तपशील मागितले. एक म्हणजे तुमचे गिऱ्हाईक कोण ते सांगा आणि त्यांनी तुमच्याकडे कशी कशी मागणी नोंदवली आणि तुम्ही ती कशी कशी पूर्ण केली तेवढे फक्त सांगा. राजेश एक्स्पोर्ट्सने 'सेबी'कडे कित्येक 'जीबी'चा डेटा आणि हजारो कागदपत्रे सादर केली. त्यात सर्व काही होते. फक्त 'सेबी'स हवे होते ते सोडून. म्हणजे या प्रकरणी काय घडले असावे? वास्तविक १५ लाख कोटी रुपयांचा महसूल कमावणाऱ्या कंपनीचे नाव ज्याच्या-त्याच्या तोंडी हवे. बाजारपेठ आणि गुंतवणूकदार तर अशा यशोगाथांच्या शोधातच असतात. अशाच एका 'बैजू' नामे यशोगाथेचे अलीकडे काय झाले आणि काही वर्षांपूर्वी 'सत्यम'चे गगनभेदी यश कुठे गेले याचे स्मरण या प्रसंगी करणे अयोग्य. पण तरीही 'राजेश एक्स्पोर्ट्स'चे हे भव्यदिव्य यश बाजारपेठेत कोणालाही दिसले नाही.

# धरती आबा बिरसा मुंडांचा अमर वारस



भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा विविध संघर्ष, त्याग, बलिदान आणि जनआंदोलनांनी समृद्ध झालेला इतिहास आहे. या इतिहासात अनेक महान नेत्यांनी आपल्या कार्याने आणि विचारांनी अमिट ठसा उमटविला आहे. तथापि, दीर्घकाळ भारतीय इतिहासलेखनाच्या मुख्य प्रवाहात काही अशा व्यक्तिमत्त्वांकडे तुलनेने कमी लक्ष दिले गेले, ज्यांनी आपल्या समाजासाठी आणि देशासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. अशा महान व्यक्तिमत्त्वांमध्ये बिरसा मुंडा यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि अस्तित्वासाठी संघर्ष करणारे बिरसा मुंडा हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे, सामाजिक परिवर्तनाचे आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे प्रतीक होते. आदिवासी समाज त्यांना प्रेमाने आणि आदराने "धरती आबा" म्हणजेच "धरतीचे पिता" म्हणून संबोधतो. ९ जून हा त्यांचा स्मृतिदिन असून हा दिवस केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा नसून आदिवासी समाजाच्या अस्मितेचा, संघर्षाचा आणि स्वाभिमानाचा गौरव करण्याचा दिवस आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारत ब्रिटिश सत्तेच्या जोखडाखाली होता. इंग्रजांनी आपल्या प्रशासनिक आणि आर्थिक धोरणांच्या माध्यमातून भारतीय समाजातील विविध घटकांवर प्रभाव टाकला. या धोरणांचा सर्वाधिक विपरीत परिणाम आदिवासी समाजावर झाला. जंगल, जमीन आणि जल यांवर आधारित जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजाचे अस्तित्वच धोक्यात आले. ब्रिटिशांनी वनकायदे लागू करून जंगलांवरील आदिवासींचे पारंपरिक हक्क नाकारले. महसूल व्यवस्थेमुळे त्यांच्या जमिनींवर कर लादले गेले. सावकार, व्यापारी आणि जमीनदार यांच्या संगनमताने आदिवासींच्या जमिनी बळकावल्या जाऊ लागल्या. परिणामी हजारो आदिवासी कुटुंबे आपल्या पारंपरिक उपजीविकेपासून वंचित झाली. त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर गंभीर परिणाम झाला. अशा कठीण परिस्थितीत आदिवासी समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारे नेतृत्व बिरसा मुंडा यांनी केले. १५ नोव्हेंबर १८७५ रोजी आजच्या झारखंड राज्यातील उलिहातू या गावात बिरसा मुंडा यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सुगना मुंडा आणि आई करमी हातू हे सामान्य आदिवासी कुटुंबातील कष्टकरी होते. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्यांच्या कुटुंबाला वारंवार स्थलांतर करावे लागत असे. अशा परिस्थितीत वाढलेल्या बिरसा यांना लहानपणापासूनच श्रम, संघर्ष आणि वास्तव जीवनाचा परिचय झाला. बालपणीच त्यांच्यामध्ये नेतृत्वाचे गुण आणि तीक्ष्ण निरीक्षणशक्ती दिसून येत होती. निसर्गाशी असलेले त्यांचे नाते अतिशय घट्ट होते. जंगल, डोंगर, नद्या आणि ग्रामीण जीवन यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल प्रभाव पडला. बिरसा यांनी प्राथमिक शिक्षण स्थानिक शाळेत घेतले. पुढे त्यांना जर्मन मिशन शाळेत शिक्षण घेण्याची संधी मिळाली. शिक्षणामुळे त्यांच्या विचारविश्वाला नवी दिशा मिळाली. त्यांनी समाजातील विषमता, अन्याय आणि शोषण यांचे बारकाईने निरीक्षण केले. मिशनरी शिक्षणाच्या काळात त्यांना आधुनिक शिक्षणाचा परिचय झाला, परंतु त्याचवेळी त्यांनी आपल्या समाजाच्या सांस्कृतिक परंपरांचे महत्त्वही जाणले. शिक्षणामुळे त्यांच्यात चिकित्सक दृष्टिकोन विकसित झाला. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, अशिक्षण आणि व्यसनाधीनतेची कारणे समजून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच ब्रिटिश सत्तेच्या धोरणांमुळे आदिवासी समाजावर होणाऱ्या परिणामांचाही त्यांनी अभ्यास केला. त्या काळात आदिवासी समाज अनेक समस्यांनी ग्रस्त होता. आर्थिक शोषण, सामाजिक उपेक्षा, अशिक्षण आणि अंधश्रद्धा यांमुळे समाजाची प्रगती खुंटली होती. बिरसा यांनी ओळखले की समाजाच्या उन्नतीसाठी सर्वप्रथम सामाजिक जागृती आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी समाजसुधारणेचे कार्य हाती घेतले. त्यांनी लोकांना मद्यपान, जादूटोणा, अंधश्रद्धा आणि इतर सामाजिक कुरीतींपासून दूर राहण्याचे आवाहन केले. त्यांनी स्वच्छता, शिक्षण, शिस्त, नैतिकता आणि परिश्रम यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे आणि प्रेरणादायी विचारांमुळे हजारो लोक त्यांच्या सभांमध्ये सहभागी होऊ लागले. बिरसा मुंडा हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते एक धार्मिक जागृतीचे प्रणेतेही होते. त्यांनी आदिवासी समाजाला त्यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक मुळांशी जोडण्याचा प्रयत्न केला. त्या काळात विविध धर्मप्रचारक संस्थांचा आदिवासी भागांमध्ये प्रभाव वाढत होता. अनेक आदिवासी आपली पारंपरिक ओळख गमावण्याच्या स्थितीत होते. बिरसा यांनी आदिवासी संस्कृती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचे संरक्षण करण्यासाठी चळवळ उभारली. त्यांनी एकेश्वरवादाचा संदेश दिला आणि नैतिक जीवन जगण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या अनुयायांमध्ये एक नवीन धार्मिक-सामाजिक चेतना निर्माण झाली. पुढे ही चळवळ "बिरसाईत" म्हणून प्रसिद्ध झाली. बिरसा यांच्या विचारांचा प्रभाव झपाट्याने वाढू लागला. लोक त्यांना केवळ समाजसुधारक म्हणून नव्हे, तर एक आध्यात्मिक नेता म्हणूनही पाहू लागले. त्यांच्या सभांमध्ये हजारो लोक सहभागी होत. त्यांनी लोकांमध्ये आत्मसन्मान आणि आत्मविश्वास निर्माण केला. त्यांनी सांगितले की कोणताही समाज आपल्या हक्कांसाठी जागरूक झाला तर त्याला कोणीही गुलाम बनवू शकत नाही. त्यांच्या संदेशामुळे आदिवासी समाजात एक नवीन जागृती निर्माण झाली. दरम्यान, ब्रिटिश सत्तेच्या धोरणांमुळे आदिवासींच्या समस्या अधिकच वाढत होत्या. जंगलांवरील निर्बंधांमुळे त्यांची उपजीविका धोक्यात आली होती. जमीनदार आणि सावकार यांच्या शोषणामुळे अनेक कुटुंबे कर्जबाजारी झाली होती. आदिवासींना त्यांच्या स्वतःच्या जमिनीवर मजूर म्हणून काम करावे लागत होते. या परिस्थितीने बिरसा यांच्या मनात तीव्र असंतोष निर्माण झाला. त्यांनी ओळखले की सामाजिक सुधारणांसोबतच राजकीय संघर्षही आवश्यक आहे. म्हणून त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून अन्यायाविरुद्ध लढण्याचे आवाहन केले. याच काळात बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली "उलगुलान" या ऐतिहासिक चळवळीची सुरुवात झाली. "उलगुलान" म्हणजे महान क्रांती किंवा महान उठाव. ही चळवळ आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि स्वातंत्र्यासाठी उभारलेली व्यापक लोकचळवळ होती. बिरसा यांनी "अबुआ दिशुम, अबुआ राज" म्हणजे "आपला देश, आपले राज्य" हा संदेश दिला. या घोषणेमध्ये स्वराज्याची बीजे दडलेली होती. त्यांनी आदिवासींना अन्यायकारक कर भरण्यास नकार देण्याचे आणि आपल्या जमिनींचे रक्षण करण्याचे आवाहन केले. १८९५ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांच्या वाढत्या प्रभावामुळे त्यांना अटक केली. त्यांना कारावासाची शिक्षा झाली. परंतु तुरुंगवासामुळे त्यांच्या लोकप्रियतेत घट झाली नाही. उलटपक्षी, त्यांचे विचार अधिक व्यापक प्रमाणात लोकांपर्यंत पोहोचले. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी नव्या जोमाने चळवळीला सुरुवात केली. त्यांनी आदिवासी समाजाला अधिक संघटित केले आणि ब्रिटिशांविरुद्ध संघर्षाची तयारी केली. १८९९ आणि १९०० या काळात उलगुलान चळवळ आपल्या शिखरावर पोहोचली. हजारो आदिवासी बिरसा यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सत्तेविरुद्ध उभे राहिले. अनेक ठिकाणी सरकारी यंत्रणांविरुद्ध प्रतिकार करण्यात आला. शोषण करणाऱ्या जमीनदारांविरुद्ध संघर्ष उभारण्यात आला. या उठावामुळे ब्रिटिश प्रशासन हादरून गेले. आदिवासी समाजाची एकजूट आणि त्यांची संघर्षशक्ती पाहून ब्रिटिश सरकार चिंतेत पडले. उलगुलान चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ राजकीय बंड नव्हती. ती सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मुक्तीची चळवळ होती. आदिवासी समाजाला त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, त्यांची जमीन वाचविणे आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे हे तिचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात या चळवळीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ब्रिटिश सरकारने या उठावाचे दमन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लष्करी कारवाई केली. अनेक आदिवासींना अटक करण्यात आली. अनेकजण संघर्षात शहीद झाले. अखेर ३ फेब्रुवारी १९०० रोजी बिरसा मुंडा यांना अटक करण्यात आली. त्यांना रांची कारागृहात ठेवण्यात आले. कारागृहात असताना त्यांची प्रकृती खालावत गेली. ९ जून १९०० रोजी अवघ्या पंचविसाव्या वर्षी त्यांचे निधन झाले. अधिकृत नोंदीनुसार त्यांचा मृत्यू कॉलऱ्यामुळे झाला असे सांगण्यात आले. तथापि, त्यांच्या मृत्यूबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. त्यांच्या अकाली निधनामुळे आदिवासी समाजाला मोठा धक्का बसला, परंतु त्यांच्या विचारांची ज्योत मात्र विझली नाही. बिरसा मुंडा यांचे जीवन हे प्रेरणेचा अखंड स्रोत आहे. त्यांनी अत्यंत कमी वयात आपल्या समाजाला नवी दिशा दिली. त्यांनी आदिवासी समाजात स्वाभिमानाची भावना जागवली. अन्यायाविरुद्ध लढण्याचे धैर्य दिले. त्यांनी दाखवून दिले की संघटित समाज कोणत्याही शोषणकारी व्यवस्थेला आव्हान देऊ शकतो. त्यांच्या नेतृत्वामुळे आदिवासी समाजाला स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव झाली. त्यांच्या संघर्षाचा परिणाम पुढील काळात विविध धोरणांमध्ये दिसून आला. ब्रिटिश सरकारला आदिवासी प्रश्नांकडे गांभीर्याने पाहावे लागले. छोटानागपूर टेनन्सी कायद्यासारख्या उपाययोजनांमुळे आदिवासी जमिनींच्या संरक्षणासाठी काही प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे बिरसा मुंडा यांचे योगदान केवळ एका आंदोलनापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा दीर्घकालीन प्रभाव पडला. स्वातंत्र्यानंतर भारताने सामाजिक न्याय आणि समतेच्या दिशेने अनेक पावले उचलली. आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. तरीही आज अनेक आदिवासी समुदाय दारिद्र्य, अशिक्षण, बेरोजगारी, आरोग्यविषयक समस्या आणि विस्थापन यांसारख्या आव्हानांना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत बिरसा मुंडा यांचे विचार आणि कार्य अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला आत्मसन्मान, संघटन आणि स्वावलंबनाचा संदेश आजही मार्गदर्शक आहे. आजच्या काळात पर्यावरणसंवर्धन आणि शाश्वत विकास यांविषयी जगभर चर्चा होत आहे.

- डॉ. राजेंद्र बगाटे

## पान १ वरून...

### १५ ऑगस्टपासून एअर इंडिया...

भोसले यांनी इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराचे स्वरूप महाराष्ट्राच्या वैभवाला साजेसे आकर्षक आणि सुशोभित करण्याच्या सूचना दिल्या. यासाठी देशातील नामांकित वास्तुविशारद आणि तज्ज्ञ संस्थांचे मार्गदर्शन घेण्यासही सांगितले आहे. मंत्रालयीन कामांसाठी राज्याच्या विविध भागांतून मुंबईत येणाऱ्या नागरिकांची सुरक्षितता, सुलभता आणि सुविधा यांना सर्वोच्च प्राधान्य देत सर्व कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. दरम्यान, एअर इंडिया इमारतीच्या खरेदीला राज्य मंत्रिमंडळाने ८ सप्टेंबर २०२३ रोजी मंजुरी दिली होती. त्यानंतर आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून राज्य सरकारने एअर इंडिया ॲसेट होल्डिंग कॉर्पोरेशनकडून ही इमारत १,६०१ कोटी रुपयांना संपादित केली. सार्वजनिक बांधकाम विभागाने निधी अदा केल्यानंतर मंगळवारी ही वास्तू अधिकृतपणे राज्य सरकारच्या ताब्यात आली. या हस्तांतरणाला महाराष्ट्राच्या प्रशासकीय पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणातील महत्त्वाचा टप्पा मानले जात असून, गुणवत्तापूर्ण दुरुस्ती, दीर्घकालीन टिकाऊपणा आणि नागरिकांच्या सोयींना प्राधान्य देत या वास्तूचा आदर्श शासकीय संकुल म्हणून विकास करण्याचा राज्य सरकारचा मानस आहे.

### भारत-इस्त्रायल मैत्रीचे नवे पर्व!

रेवाच यांनी सांगितले की, मुंबईत आल्यानंतर त्यांनी मराठा साम्राज्याचा इतिहास अभ्यासला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याने ते प्रभावित झाले. शिवाजी महाराज हे केवळ मराठा साम्राज्याचे संस्थापक नव्हते, तर ते दूरदृष्टी असलेले शासक, कुशल सेनानी आणि लोककल्याणकारी नेतृत्वाचे प्रतीक होते. सुशासन, धार्मिक सहिष्णुता, सागरी सामर्थ्य आणि प्रजेच्या सुरक्षेबाबतची त्यांची धोरणे आजही प्रेरणादायी आहेत. भारतात सर्वत्र शिवाजी महाराजांबद्दल असलेला आदर पाहून इस्रायलमध्येही त्यांच्या कार्याची अधिक व्यापक ओळख व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

### देशातील खाद्यतेल विक्रीबाबत केंद्र...

या प्रमाणित वजनाच्या पॅकमुळे ग्राहकांना वेगवेगळ्या कंपन्यांच्या खाद्यतेलाच्या किमतीची तुलना करून खरेदीचा अधिक योग्य निर्णय घेणे शक्य होणार आहे. खाद्यतेलाच्या २०० मिली अथवा २०० ग्रॅमपेक्षा कमी वजनाच्या पॅकना या नियमावलीतून वगळण्यात आले आहे. ग्राहकांना परवडणाऱ्या दरातील छोटे पॅक उपलब्ध व्हावेत, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती केंद्रीय ग्राहक कामकाज मंत्रालयाने दिली आहे.

### बीकेसीत दर शुक्रवारी 'सार्वजनिक...

बीकेसीमध्ये दररोज कामानिमित्त येणाऱ्या सुमारे दोन लाख नागरिकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन एमएमआरडीएकडून करण्यात आले आहे. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त डब्ल्यूआरआय इंडियाच्या सहकार्याने या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. सरकारी अधिकारी, वाहतूक संस्था, कॉर्पोरेट क्षेत्रातील प्रतिनिधी आणि गतिशीलता क्षेत्रातील तज्ज्ञांच्या उपस्थितीत झालेल्या गोलमेज परिषदेत या उपक्रमाची घोषणा करण्यात आली होती. बीकेसी हे मुंबईतील आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक केंद्र मानले जाते. मात्र येथे येणाऱ्या बहुतांश नागरिकांकडून वैयक्तिक वाहने, टॅक्सी आणि रिक्षांचा वापर केला जातो. उपलब्ध माहितीनुसार केवळ २५ टक्के प्रवासी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करतात, तर ५४ टक्के प्रवाशांना दररोज प्रवासासाठी दोन तासांहून अधिक वेळ खर्च करावा लागतो. प्रत्येक पाच प्रवाशांपैकी एकाचा प्रवास तीन तासांपेक्षा जास्त कालावधीचा असतो. मेट्रो, रेल्वे किंवा बस स्थानकांपासून अंतिम गंतव्यस्थळी पोहोचण्यासाठी पुरेसे पर्याय नसल्यामुळे अनेक नागरिक वैयक्तिक वाहनांवर अवलंबून राहतात. तरीही ८२ टक्के प्रवासी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यास तयार असल्याचे समोर आले असून त्यासाठी अधिक सक्षम आणि सुलभ वाहतूक व्यवस्था उपलब्ध करण्याची मागणी त्यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी, प्रदूषण आणि इंधनाचा वापर कमी करण्यासाठी एमएमआरडीएने हा उपक्रम हाती घेतला असून दर शुक्रवारी अधिकाधिक नागरिकांनी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबवली जाणार आहे.

### वडापाव पॅकिंगसाठी वर्तमानपत्र...

ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने केवळ सुरक्षित आणि मान्यताप्राप्त 'फूड-ग्रेड' पॅकेजिंग साहित्याचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले असून ग्राहकांनीही याबाबत सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एफएसएसएआय आणि राज्यस्तरीय प्राधिकरणे संयुक्तपणे काम करत असून सुरक्षित व टिकाऊ पॅकेजिंगच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच अन्न-सुरक्षा जागरूकता वाढविण्यासाठी विविध उपाययोजना राबवत आहेत.

### एफडीएमध्ये तुकाराम मुंढेंची कडक...

तसेच नागरिकांनी आपल्या परिसरात सुरू असलेल्या अन्न व औषध भेसळीच्या, बनावट औषधांच्या किंवा प्रतिबंधित पदार्थांच्या बेकायदेशीर विक्रीबाबत न घाबरता प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन एफडीएकडून करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, अशी हमीही विभागाने दिली असून नागरिकांच्या सहकार्यामुळे अशा गैरप्रकारांवर अधिक प्रभावीपणे नियंत्रण मिळवता येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

### मान्सून अखेर महाराष्ट्रात धडकला

पुढच्या तीन-चार दिवसांत राज्याच्या अंतर्गत भागांत तुरळक ठिकाणी, तर किनारी भागांत अनेक ठिकाणी पावसामध्ये हळूहळू वाढ होत जाईल. तीन-चार दिवसांत किनारी भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. विदर्भ आणि उत्तर, मध्य महाराष्ट्र; तसेच मराठवाड्याच्या काही भागात पारा चाळीस अंशांवरच राहण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवस राज्यात रात्री किमान तापमान २६ ते ३२ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. पालघर जिल्ह्यात उष्ण आणि दमट हवामानाचा पुढील दोन दिवस 'यलो ॲलर्ट' दिला आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि साताऱ्यात मध्यम ते जास्त पावसाचा 'यलो ॲलर्ट', तर रायगड, पुणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड आणि विदर्भातील बहुतांश भागांत सोसाट्याचा वारा वाहून विजांच्या कडकडाटासह तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा 'यलो ॲलर्ट' इशारा देण्यात आला आहे.


महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय

Email :- integratedmumbai.ee@mahapwd.gov.in

दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६

ई-निविदा सुचना क्र. ११ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दुरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४-७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकामखात्याकडून योग्यत्या वर्गातील नोंदणीकृत **मजूर सहकारी संस्थांकडून (फक्त बृहन्मुंबई शहर)** खालील कामांकरीत **"ब-१"** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहोत. निविदा कागदत्र शासनाच्या संकेतस्थळावर **http://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | मुंबई येथील जे. जे. रुग्णालयाच्या आवारातील इमारतीमधील (तळमजला आणि पहिला मजला) पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या खोल्यांची अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | ४९६९४५५/- |
| २ | जे. जे. रुग्णालय संकुल, मुंबई येथील इमारतीमधील (दुसरा आणि तिसरा मजला) पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या खोल्यांची अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | ४९६७१४८/- |
| ३ | जे. जे. रुग्णालय संकुल, मुंबई येथील इमारतीमधील (चौथा आणि पाचवा मजला) पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या खोल्यांची अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | ४९६९१९१/- |
| ४ | जे. जे. रुग्णालयाच्या आवारातील इमारतीमधील (सहावा आणि सातवा मजला) पी.जी. विद्यार्थ्यांच्या खोल्यांची अंतर्गत दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | ४९६७८३९/- |
| ५ | मुंबई येथील जे.जे. रुग्णालयाच्या आवारातील कॉंक्रीट रस्त्याच्या दोन्ही बाजूंना नवीन M.S. (सौम्य पोलादी) ग्रील बसवणे व निश्चित करणे (III) | ४०००९०४/- |
| ६ | मुंबई (V) येथील जे.जे. रुग्णालयाच्या आवारातील कॉंक्रीट रस्त्याच्या दोन्ही बाजूंना नवीन M.S. ग्रिल पुरवणे व बसवणे. | ४०३१५५६/- |
| ७ | कामा आणि अल्ब्लेस रुग्णालय, मुंबई येथील कामा इमारतीचे पुनरुज्जीवन करणे. | ११५१९८९/- |

(एकूण ०७ कामे)

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक ०४/०६/२०२६ सकाळी १०.३० पासून ते दिनांक ११/०६/२०२६ रोजी १५.०० पर्यंत

ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक १५/०६/२०२६ रोजी १५.०५ वाजता

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.gov.in २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.एघ(सा.बां.)/निविदा/३७८५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४/७६
दिनांक : २८/५/२०२६

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.

आरओसी - 2026-27/क्र-5/C१००५


Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# मुंबईच्या पहिल्या मेट्रोने पूर्ण केली १२ वर्षांची यशस्वी धाव

**मुंबई (विशाल कारंडे) :** मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत क्रांती घडवून आणणाऱ्या घाटकोपर-अंधेरी-वर्सोवा मेट्रो-१ मार्गिकेला रविवारी (८ जून) १२ वर्षे पूर्ण झाली. २०१४ मध्ये सेवेत दाखल झालेली ही मार्गिका आजही मुंबईकरांच्या दैनंदिन प्रवासाचा अविभाज्य भाग बनली असून गेल्या १२ वर्षांत तिने १२५ कोटींहून अधिक प्रवाशांना सेवा दिली आहे. १५ लाखांहून अधिक फेऱ्या, ९९.९९ टक्के वक्तशीरपणा आणि शून्य अपघाती मृत्यू ही या मार्गिकेची उल्लेखनीय वैशिष्ट्ये ठरली आहेत. मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मेट्रो जाळे उभारण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला. त्याअंतर्गत १४ मेट्रो मार्गिकांच्या प्रकल्पाची संकल्पना मांडण्यात आली. या प्रकल्पातील पहिली मार्गिका म्हणजे घाटकोपर-अंधेरी-वर्सोवा मेट्रो-१ होय. २००८ मध्ये या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली आणि अनेक तांत्रिक व प्रशासकीय अडचणींवर मात करत २०१४ मध्ये मार्गिका पूर्णत्वास आली. ११.४ किलोमीटर लांबीची आणि १४



स्थानकांनी सजलेली ही मार्गिका ८ जून २०१४ रोजी प्रवासी सेवेसाठी खुली करण्यात आली. मुंबईच्या इतिहासात पहिल्यांदाच मेट्रो रेल्वे धावू लागली आणि शहराच्या वाहतूक व्यवस्थेत एका नव्या पर्वाची सुरुवात झाली. पूर्व उपनगरातील घाटकोपर ते पश्चिम उपनगरातील वर्सोवा हा प्रवास पूर्वी रस्तेमार्गे किंवा उपनगरी रेल्वेच्या साहाय्याने करण्यासाठी बराच वेळ लागत असे. मात्र मेट्रोमुळे हा प्रवास जलद, आरामदायी आणि वेळेची बचत करणारा ठरला. सेवेच्या सुरुवातीच्या काळात मेट्रो-१ ला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नव्हता. अनेक प्रवासी पारंपरिक रेल्वे आणि बस सेवेवरच अवलंबून होते. मात्र कालांतराने मेट्रोच्या वेगवान, सुरक्षित आणि विश्वासार्ह सेवेची जाणीव नागरिकांना झाली. परिणामी प्रवाशांची संख्या सातत्याने वाढत गेली. आज या मार्गिकेवर दररोज सुमारे पावणेसहा लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करतात. वाढत्या प्रवासी संख्येमुळे गर्दीच्या वेळेत चार डब्यांच्या गाड्या अपुऱ्या पडत असल्याचे चित्र आहे. प्रवाशांकडून या मार्गिकेवर सहा डब्यांच्या मेट्रो गाड्या सुरू करण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे. मार्गिकेचे संचालन आणि देखभाल करणाऱ्या मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेड (एमएमओपीएल) कडून त्यासाठी प्रयत्न सुरू असले तरी आर्थिक आणि तांत्रिक अडचणींमुळे हा प्रस्ताव अद्याप प्रत्यक्षात आलेला नाही. मात्र भविष्यात सहा डब्यांच्या गाड्या सुरू झाल्यास वाढत्या प्रवासी संख्येचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. मेट्रो-१ च्या यशामागे तिचा उत्कृष्ट कार्यक्षमतेचा आलेख महत्त्वाचा मानला जातो. गेल्या १२ वर्षांत या मार्गिकेने १५ लाखांहून अधिक फेऱ्या पूर्ण केल्या असून १२५ कोटी प्रवाशांना सेवा दिली आहे. विशेष म्हणजे ९९.९९ टक्के वक्तशीरपणा राखण्यात मेट्रो-१ यशस्वी ठरली आहे. मुंबईसारख्या गजबजलेल्या महानगरात इतका उच्च दर्जाचा वेळेचा शिस्तबद्धपणा राखणे ही मोठी कामगिरी मानली जाते. मार्गिकेवर काही किरकोळ तांत्रिक बिघाड किंवा छोट्या-मोठ्या दुर्घटना घडल्या असल्या तरी आजपर्यंत एकाही प्रवाशाचा अपघाती मृत्यू झालेला नाही. त्यामुळे सुरक्षिततेच्या बाबतीतही मेट्रो-१ ने उच्च मानके प्रस्थापित केली आहेत. याच कारणामुळे लाखो प्रवासी दररोज या सेवेवर विश्वास ठेवतात. १२ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून एमएमओपीएलने प्रवाशांसाठी काही नवीन सुविधा सुरू केल्या आहेत. त्यामध्ये राष्ट्रीय कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) आणि 'ऑन द गो' कार्डचा समावेश आहे. या सुविधेमुळे प्रवाशांना एकाच कार्डद्वारे विविध सार्वजनिक वाहतूक सेवांचा लाभ घेता येणार आहे. मेट्रो-१ व्यतिरिक्त मेट्रो-२अ (दहिसर ते अंधेरी पश्चिम), मेट्रो-७ (दहिसर ते गुंदवली), मेट्रो-३ (आरे ते कफ परेड), बेस्ट बस सेवा तसेच मोनोरेलमध्येही या कार्डचा वापर करता येणार आहे. मुंबईतील पहिली मेट्रो मार्गिका म्हणून मेट्रो-१ ने केवळ वाहतुकीचा पर्याय उपलब्ध करून दिला नाही, तर शहराच्या आधुनिकतेचे आणि प्रगत वाहतूक व्यवस्थेचे प्रतीक म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

# BEST चा मोठा निर्णय! कंत्राटी चालकांसाठी ४ आठवड्यांचे प्रशिक्षण अनिवार्य

**मुंबई (राकेश गायकवाड) :** बेस्ट प्रशासनाने भाडेतत्त्वावरील विद्युत आणि सीएनजी बसच्या वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर कंत्राटी चालकांसाठी चार आठवड्यांचे विशेष प्रशिक्षण अनिवार्य केले आहे. यापूर्वी या चालकांना केवळ एका आठवड्याचे प्रशिक्षण दिले जात होते. प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित करण्यासाठी आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. नव्या प्रशिक्षणामध्ये ई-बसच्या तांत्रिक प्रणालींची माहिती, सुरक्षित वाहनचालक तंत्र, आपत्कालीन परिस्थिती हाताळणे, शिस्तबद्ध संचालन आणि प्रवासी सुरक्षेशी संबंधित बाबींवर विशेष भर दिला जाणार आहे. तसेच अरुंद रस्ते, गर्दीचे भाग, उतारावरील मार्ग आणि आधुनिक ब्रेकिंग सिस्टीमचा योग्य वापर याबाबत चालकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. मे महिन्यात बेस्ट बसच्या अपघातांच्या आणि आगीच्या अनेक घटना समोर आल्यानंतर प्रशासनाने ही कठोर भूमिका घेतली आहे. विशेषतः भांडुप आणि कुर्ला येथील घटनांनंतर चालकांच्या प्रशिक्षणाबाबत प्रश्न उपस्थित झाले होते. नियमांचे पालन न करणाऱ्या खाजगी कंत्राटदारांवर प्रति उल्लंघन १० हजार रुपयांचा दंड आकारला जाणार



असून संयुक्त तपासणीत तांत्रिक त्रुटी आढळलेल्या ११ बस तात्काळ सेवेतून हटवण्यात आल्या आहेत. बेस्टच्या महाव्यवस्थापक सोनिया सेठी यांनी चार आठवड्यांचे प्रशिक्षण कोणत्याही परिस्थितीत अनिवार्य राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. सध्या बेस्टच्या २,७९२ बसपैकी केवळ २४९ बस स्वमालकीच्या असून उर्वरित २,५४४ बस भाडेतत्त्वावरील आहेत. त्यामुळे कंत्राटी चालकांच्या प्रशिक्षण आणि देखरेखीवर अधिक भर देणे आवश्यक असल्याचे प्रशासनाचे मत आहे. या निर्णयामुळे मुंबईतील सार्वजनिक बससेवा अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह होईल, असा विश्वास बेस्ट प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# मुंबई विद्यापीठाच्या पदवी प्रवेशासाठी चौथी, पाचवी गुणवत्ता यादी जाहीर होणार



**मुंबई (सम्यक कासारे) :** मुंबई विद्यापीठाने २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील प्रथम वर्ष पदवी प्रवेश प्रक्रियेसाठी चौथ्या आणि पाचव्या फेरीचे वेळापत्रक जाहीर केले आहे. तिसऱ्या गुणवत्ता यादीपर्यंत प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी या दोन फेऱ्या महत्त्वाची संधी ठरणार आहेत. विद्यापीठाच्या ई-समर्थ पोर्टलद्वारे ही संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार, चौथी आणि पाचवी गुणवत्ता यादीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांना ५ ते ११ जूनदरम्यान दुपारी १ वाजेपर्यंत प्रवेशपूर्व नोंदणी करावी लागणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आवश्यक माहिती भरून नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच संबंधित महाविद्यालयांच्या स्वतंत्र पोर्टलवर किंवा आवश्यक असल्यास ऑफलाइन पद्धतीनेही नोंदणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. चौथी गुणवत्ता यादी १२ जून रोजी सकाळी ११ वाजता प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीत नाव आलेल्या विद्यार्थ्यांना १२ ते १५ जूनदरम्यान दुपारी ४ वाजेपर्यंत आवश्यक कागदपत्रांची ऑनलाइन पडताळणी करून प्रवेश शुल्क भरावे लागणार आहे. निर्धारित मुदतीत प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच प्रवेश निश्चित मानला जाणार आहे. चौथ्या फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी पाचवी गुणवत्ता यादी १६ जून रोजी सकाळी १० वाजता जाहीर करण्यात येईल. या यादीतील विद्यार्थ्यांना १६ ते १७ जूनदरम्यान सायंकाळी ५ वाजेपर्यंत कागदपत्र पडताळणी आणि शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

### प्रवेशाचे वेळापत्रक

- प्रवेशपूर्व नोंदणी : ५ ते ११ जून
- चौथी गुणवत्ता यादी : १२ जून (सकाळी ११ वाजता)
- पडताळणी व शुल्क भरणा : १२ ते १५ जून
- पाचवी गुणवत्ता यादी : १६ जून (सकाळी १० वाजता)
- पडताळणी व शुल्क भरणा : १६ ते १७ जून

# आयटीआय प्रवेशाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; १.१२ लाखांहून अधिक नोंदणी

**मुंबई (नितीन देवळेकर) :** राज्यातील शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या (आयटीआय) ऑगस्ट २०२६ सत्राच्या प्रवेश प्रक्रियेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून प्रवेशासाठी नोंदणी करणाऱ्यांची संख्या एक लाखाच्या पुढे गेली आहे. कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल यंदाच्या प्रवेश प्रक्रियेत स्पष्टपणे दिसून येत आहे. गुरुवारी सायंकाळपर्यंत १ लाख १२ हजार २४६ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. त्यापैकी ९१ हजार ८५९ विद्यार्थ्यांनी अर्ज प्रक्रिया पूर्ण केली असून ८७ हजार ९७२ विद्यार्थ्यांनी प्रवेश शुल्क भरले आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेच्या सुरुवातीच्या टप्प्यातच मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविल्याचे दिसून येत आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्य विभागांतर्गत कार्यरत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने (डीव्हीईटी) यंदाही सर्व शासकीय आणि मान्यताप्राप्त खासगी आयटीआय संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया केंद्रीकृत ऑनलाइन पद्धतीने सुरू केली आहे. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे आणि प्रवेश प्रक्रियेचा मागोवा घेणे सोपे झाले आहे. तसेच पारदर्शकता वाढून वेळ आणि खर्चाचीही बचत होत आहे. सध्या अर्ज नोंदणी, अर्ज भरणे, शुल्क भरणे, अर्ज निश्चिती आणि पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व




संस्थानिहाय पर्याय नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. डीव्हीईटीने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार अर्ज भरणे, अर्जातील दुरुस्ती आणि शुल्क भरण्याची प्रक्रिया २१ जूनपर्यंत सुरू राहणार आहे. अर्ज निश्चित करण्याची अंतिम मुदत २२ जून असून पहिल्या फेरीसाठी पर्याय अर्ज २३ जूनपर्यंत भरता येणार आहेत. २५ जून रोजी सायंकाळी पाच वाजता प्राथमिक गुणवत्ता यादी जाहीर केली जाणार आहे. त्यानंतर २६ व २७ जून रोजी विद्यार्थ्यांना हरकती नोंदविण्याची आणि अर्जातील काही माहिती दुरुस्त करण्याची संधी दिली जाणार आहे. सर्व हरकतींची छाननी झाल्यानंतर २८ जून रोजी अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पुढील प्रवेश फेऱ्यांचे सविस्तर वेळापत्रक २५ जून रोजी जाहीर होणार आहे. प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांना मदत मिळावी यासाठी राज्यभरात ३३१ सुविधा केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. या केंद्रांमध्ये अर्ज भरणे, कागदपत्रे स्कॅन करणे, अपलोड करणे आणि अर्ज निश्चित करणे यासाठी आवश्यक सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ही केंद्रे सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सुरू राहणार आहेत. गेल्या काही वर्षांत आयटीआय शिक्षणाला विद्यार्थ्यांकडून वाढता प्रतिसाद मिळत आहे. उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी आणि कौशल्य विकासाला मिळणारे महत्त्व यामुळे आयटीआय अभ्यासक्रम लोकप्रिय ठरत आहेत.

# सर्व विद्यापीठांसाठी एकच आर्थिक संहिता; पारदर्शकतेसाठी राज्य सरकारचा पुढाकार

**मुंबई (गणेश बागडे) :** राज्यातील सर्व विद्यापीठांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये सुसूत्रता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्याच्या उद्देशाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राज्य सरकारच्या अखत्यारीतील १३ विद्यापीठांसाठी समान "ऑडिट अँड फायनान्स कोड" लागू करण्याची तयारी सुरू करण्यात आली असून त्यासाठी व्यापक आर्थिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. सध्या प्रत्येक विद्यापीठाचा आर्थिक कारभार स्वतंत्र नियमावलीनुसार चालतो. निधीचा वापर, खर्चाचे निकष, खरेदी प्रक्रिया आणि लेखापरीक्षण पद्धतींमध्ये मोठ्या प्रमाणात फरक आढळतो. ही विसंगती दूर करून सर्व विद्यापीठांसाठी एकसमान आर्थिक चौकट निर्माण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.




यामुळे सार्वजनिक निधीचा वापर अधिक शिस्तबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने होण्यास मदत होणार असल्याचे विभागाचे म्हणणे आहे. या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात एसएनडीटी महिला विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे विशेष लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीतील आर्थिक व्यवहार आणि प्रशासकीय प्रक्रियांची सखोल तपासणी केली जाणार आहे. लेखापरीक्षणामध्ये विद्यार्थी प्रवेश व शुल्क वसुली, शिष्यवृत्ती वितरण, वेतन प्रक्रिया, कर्मचारी नोंदी, खरेदी व्यवहार, कंत्राटे, इमारत आणि पायाभूत सुविधा प्रकल्प, संशोधन अनुदान, सीएसआर निधी, वसतिगृह व उपहारगृह व्यवस्थापन, परीक्षा शुल्क व्यवहार आदी विविध बाबींचा समावेश असेल. तसेच जमीन, इमारती, प्रयोगशाळा साहित्य आणि ग्रंथालयातील संसाधनांची प्रत्यक्ष पडताळणीही करण्यात येणार आहे. याशिवाय माहिती तंत्रज्ञान प्रणाली, सायबर सुरक्षा खर्च, सॉफ्टवेअर खरेदी, परदेशी संस्थांशी सहकार्य करार, राखीव प्रवर्गातील प्रवेश प्रक्रिया, परीक्षा व्यवस्थापन तसेच बँक ठेवी आणि गुंतवणुकींच्या व्यवस्थापनाचाही आढावा घेतला जाणार आहे. संभाव्य महसूल गळती, आर्थिक अनियमितता किंवा दुबार देयके यांचा शोध घेण्यावरही भर दिला जाणार आहे. दरम्यान, या निर्णयावर काही माजी विद्यापीठ प्रशासकांनी आक्षेप घेतला आहे. या प्रक्रियेमुळे विद्यापीठांच्या प्रशासकीय स्वायत्ततेवर परिणाम होऊ शकतो, अशी त्यांची भूमिका आहे. विद्यापीठांमध्ये आधीपासूनच वित्त समित्या, खरेदी समित्या आणि स्वतंत्र लेखापरीक्षण यंत्रणा कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. मात्र उच्च व तंत्र शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मते, नवीन आर्थिक संहिता तयार करण्यासाठी हे लेखापरीक्षण आवश्यक आहे. सार्वजनिक निधीचा अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक वापर सुनिश्चित करणे हा यामागील मुख्य उद्देश असून पुढील टप्प्यात राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात आर्थिक व्यवस्थापनासाठी एकसमान आणि अधिक जबाबदार प्रणाली विकसित होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कुपोषणमुक्त महाराष्ट्रासाठी १,००० दिवस निर्णायक

**मुंबई (विशाल कारंडे) :** राज्यातील कुपोषणाचे आव्हान अद्याप कायम असल्याने गंभीर तीव्र कुपोषित (सॅम) आणि मध्यम कुपोषित (मॅम) बालकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश कुपोषण निर्मूलन टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. दीपक सावंत यांनी दिले. माता व बालकांच्या आयुष्यातील पहिले एक हजार दिवस कुपोषण रोखण्यासाठी सर्वाधिक महत्त्वाचे असल्याचे नमूद करत जिल्हास्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यावर त्यांनी भर दिला. कुपोषित बालकांची स्थिती, उपचार व्यवस्थापन आणि विविध पोषण योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेताना बालकांचे नियमित वजन मोजणे, अद्ययावत नोंदी ठेवणे, पोषण पंधरवाडा, चावडी वाचन आणि समुदाय सहभागाच्या माध्यमातून जनजागृती वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या. आदिवासी भागातील मुलींची हिमोग्लोबिन तपासणी, गर्भवती महिलांचे पोषण, रक्तक्षय नियंत्रण तसेच कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण कमी करण्यावर विशेष भर देण्यात आला. अमृत आहार योजनेच्या अंमलबजावणीचाही आढावा घेण्यात आला. लाभार्थ्यांना केळी, अंडी आणि इतर पोषक आहाराचा नियमित पुरवठा सुनिश्चित करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. धाराशिव, सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मेळघाट, कोल्हापूर आणि निफाड आदी भागांतील स्थितीचा आढावा घेण्यात आला. काही ठिकाणी कुपोषणाविरोधातील उपाययोजना अधिक तीव्र करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. दुर्गम भागांमध्ये डे-केअर सेंटरचा विस्तार आणि माता-बालकांसाठीच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देशही देण्यात आले. डॉ. सावंत म्हणाले, "कुपोषणमुक्त महाराष्ट्र हे केवळ शासकीय उद्दिष्ट नाही, तर राज्याच्या भावी पिढीच्या आरोग्याशी संबंधित मिशन आहे. बालकांच्या आयुष्यातील पहिले एक हजार दिवस अत्यंत महत्त्वाचे आहेत. या काळात योग्य पोषण, वेळेवर उपचार आणि प्रभावी देखरेख सुनिश्चित केली तर कुपोषणावर निर्णायक मात करता येईल. प्रत्येक जिल्ह्याने मोजता येतील असे परिणाम साधण्यावर भर द्यावा.

# मुंबईतील प्रत्येक क्षेपणभूमी परिसरात वृक्ष लागवड केली जाणार; नागरिकांनी अभियानात सहभागी व्हावे - महापौर श्रीमती रितू तावडे

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** मुंबईत हरित क्षेत्र आणि नागरी वन निर्मितीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत. 'रिरुट (Re-Root)' हा नागरी वन पुनर्स्थापना उपक्रमसुद्धा याच प्रयत्नांचा भाग आहे. तथापि, मुंबईत हरितक्षेत्र वृद्धिंगत करण्यासाठी प्रशासनासोबतच नागरिकांनी देखील पुढाकार घ्यायला हवा. प्रत्येकाने किमान एकतरी झाड लावावे, असे आवाहन मुंबईच्या महापौर श्रीमती रितू तावडे यांनी केले आहे. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिका आणि अँटोनी वेस्ट हँडलिंग सेल लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'रिरुट (ReRoot)' या नागरी वन पुनर्स्थापना उपक्रमाचा मुंबईच्या महापौर श्रीमती रितू तावडे



यांच्या शुभहस्ते कांजूरमार्ग क्षेपणभूमी येथील कचरा प्रक्रिया केंद्र येथे दिनांक ५ जून २०२६ शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी श्रीमती तावडे बोलत होत्या. स्थायी समिती अध्यक्ष श्री. प्रभाकर शिंदे, एस आणि टी विभागाच्या प्रभाग समिती अध्यक्ष श्रीमती साक्षी दळवी यांनी देखील या उपक्रमात सहभाग



नोंदवला. उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) श्री. किरण दिघावकर यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. तसेच, शालेय विद्यार्थी, विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, नागरिक आदी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले. बहावा आणि इतर स्थानिक वृक्षप्रजातींची शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून लागवड करुन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांसह नागरिकही या उपक्रमात मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. या माध्यमातून शुभारंभप्रसंगी सुमारे ७५० झाडे लावण्यात आली. घनकचरा व्यवस्थापन पायाभूत सुविधांचे हरित आणि शाश्वत परिसंस्थेमध्ये रूपांतर करण्याच्या उद्देशाने 'रिरुट' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत, कांजूरमार्ग क्षेपणभूमी परिसरात सुमारे १६ हजार नवीन वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. यामध्ये सातपेक्षा अधिक स्थानिक व पर्यावरणास अनुकूल वृक्षप्रजातींचा समावेश आहे. याठिकाणी आधीपासून सुमारे १२,८०० वनस्पती अस्तित्वात असून या उपक्रमामुळे मुंबईच्या हरित क्षेत्रात मोठी भर पडणार आहे. मुंबईच्या महापौर श्रीमती रितू तावडे यावेळी म्हणाल्या की, मुंबईतील वाढते नागरीकरण, लोकसंख्येची घनता आणि इतर अन्य बाबी लक्षात घेऊन येथे हरित क्षेत्र वाढविण्यावर भर दिला जात आहे. मोठ्या प्रमाणात सुरू असलेली विकासकामे, पायाभूत सुविधांची निर्मिती आदींमुळे काही ठिकाणी वृक्ष कपात करावी लागली. मात्र, विकासकामेही तितकीच महत्वाची असतात. तथापि, या विकासकामांमुळे झालेली नैसर्गिक हानी भरून काढण्यासाठी अन्यत्र वन आणि हरित क्षेत्र निर्मिती करण्यासाठी पुढाकार घेतला जातो. एका झाडाच्या बदल्यात दहा झाडे लावली जातात. 'रिरुट (Re-Root)' हा नागरी वन पुनर्स्थापना उपक्रमसुद्धा अशाच प्रयत्नांपैकी एक आहे. कांजूरमार्ग क्षेपणभूमीप्रमाणेच इतरही क्षेपणभूमीच्या ठिकाणी तसेच गृहसंस्थांच्या परिसरात अशाप्रकारे वृक्ष लागवड करून वनक्षेत्र निर्मिती केली जाईल. तथापि, नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन मुंबईला अधिक हरित आणि पर्यावरणस्नेही बनवण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन श्रीमती तावडे यांनी यावेळी केले.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण

**■ नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल १ वर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण करण्यात आले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण अत्यंत उत्साहात पार पडले. हा पुतळा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अलौकिक नेतृत्व आणि दैदिप्यमान वारशाला दिलेली एक आदरांजली असून, तो महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडवतो. या ऐतिहासिक सोहळ्याप्रसंगी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, महिला व बालविकास मंत्री अदिती सुनील तटकरे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश



बालदी आणि माजी खासदार रामशेठ ठाकूर उपस्थित होते. तसेच भूमिपुत्र स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे व्यवस्थापक यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी आणि मान्यवर या प्रसंगी प्रामुख्याने उपस्थित होते. नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड (NMIAL) द्वारे विकसित करण्यात आलेल्या या स्मारकामध्ये ८ फुटांच्या भव्य चबूतऱ्यावर १२ फुटांचा कांस्य धातूचा अर्धपुतळा (बस्ट) बसवण्यात आला आहे. नवी मुंबईतील 'आकार आर्ट अँड स्कल्पचर'चे शिल्पकार श्री. नितीन रोहिदास गोर्डे यांनी हा पुतळा साकारला असून, महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयाने मान्यता दिलेल्या प्रारूपावर आधारित कॉपर अलॉय ब्रॉन्झ (तांबे मिश्रित कांस्य) मध्ये याची निर्मिती करण्यात आली आहे. सुमारे आठ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीत पूर्ण झालेली ही वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील एक प्रमुख आकर्षण ठरणार आहे. तसेच विमानतळावर येणाऱ्या देशी-विदेशी प्रवाशांसाठी आणि अभ्यागतांसाठी हे स्थान सांस्कृतिक महत्त्वाचे एक मुख्य केंद्र बनेल यात शंका नाही.

# डोंबिवलीत पुन्हा डान्सबारचा धिंगाणा

- मानपाडा पोलिसांची तनिष्का बारवर धाड
- पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर पहाटे पर्यंत सुरू होता डान्सबार
- २२ जणांविरोधात गुन्हा दाखल, १२ महिलांची केली सुटका

**■ कल्याण (आकाश कांबळे) :** डोंबिवलीत बेकायदेशीर डान्सबार पुन्हा पहाटे पर्यंत सुरू असल्याचे उघड झाले आहे. मानपाडा पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या तनिष्का बारवर पोलिसांनी धाड टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत डान्सबार व्यवस्थापक, वेटर, ऑर्केस्ट्रा कलाकार आणि ग्राहकांसह २२ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच बारमधून १२ महिलांची सुटका करण्यात आली असून या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. डोंबिवलीतील मानपाडा पोलीस ठाण्याजवळ असलेल्या तनिष्का बारमध्ये बेकायदेशीररित्या डान्सबार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या विशेष पथकाने रात्री उशीरा बारवर छापा टाकला. कारवाईदरम्यान महिलांना टोकळे कपडे परिधान करून हिंदी गाण्यांवर नृत्य करताना तसेच अश्लील हावभाव करत ग्राहकांचे मनोरंजन करत असल्याचे आढळून आले. यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत डान्सबार व्यवस्थापक, वेटर, एक ऑर्केस्ट्रा कलाकार आणि सहा ग्राहकांना अटक केली. तसेच बारमधून १२ महिलांची सुटका करण्यात आली असून त्यांची चौकशी सुरू आहे.या प्रकरणी एकूण २२ जणांविरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी बारमधील सीसीटीव्ही फुटेज, आर्थिक व्यवहारांची कागदपत्रे तसेच परवान्यासंदर्भातील दस्तऐवज जप्त केले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास मानपाडा पोलीस करत आहेत.

# 'फिट इंडिया' उपक्रमाला भरघोस प्रतिसाद

**■ मुरबाड (विशाल कारंडे) :** मुरबाड पोलीस ठाणे, ठाणे ग्रामीण यांच्या वतीने 'फिट इंडिया' अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेला सायक्लोथॉन तसेच झुंबा डान्स व दोरी उडी कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमास मुरबाड तालुक्यातील युवक-युवती, विद्यार्थी, महिला तसेच विविध सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. सकाळी आयोजित करण्यात आलेल्या सायक्लोथॉनमध्ये सहभागी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत फिटनेस व आरोग्याबाबत जागरूकतेचा संदेश दिला. त्यानंतर मुरबाड पोलीस स्टेशन येथील कम्युनिटी हॉलमध्ये




आयोजित झुंबा डान्स व दोरी उडी कार्यक्रमात सहभागी नागरिकांनी जोमाने सहभाग घेतला. कार्यक्रमाद्वारे नियमित व्यायाम, आरोग्यदायी जीवनशैली आणि शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.सदर कार्यक्रम पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण डॉ. विक्रमकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल लाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक सचिन इंदुलकर यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार, स्वयंसेवक व सहभागी नागरिकांचे मुरबाड पोलीस ठाण्याच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# फिट इंडिया 'संडे ऑन सायकल' उपक्रमात मुंब्रा पोलीस विभागाचा उल्लेखनीय सहभाग

## पोलीस आयुक्तांकडून पदक देऊन गौरव

**■ ठाणे (तृप्ती गोरे) :** भारत सरकारच्या क्रीडा विभागाच्या निर्देशानुसार जागतिक सायकल दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'फिट इंडिया – संडे ऑन सायकल' उपक्रमात मुंब्रा पोलीस विभागाने उल्लेखनीय सहभाग नोंदवत आपला ठसा उमटविला. या उपक्रमातील उत्कृष्ट सहभागाबद्दल मुंब्रा पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा ठाणे पोलीस आयुक्तांच्या हस्ते वर्ष २०२६ चे पदक देऊन सन्मान करण्यात आला. फिट इंडिया अभियानांतर्गत १ जून ते १४ जून २०२६ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्याचाच एक भाग म्हणून रविवार, दि. ७ जून रोजी सकाळी ६




वाजता ठाण्यातील साकेत मैदान येथून १० किलोमीटर सायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीत पोलीस विभागासह विविध शासकीय विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, नियमित व्यायाम व फिटनेसला प्रोत्साहन देणे तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. साकेत मैदानातून सुरू झालेली सायकल रॅली निर्धारित मार्गाने पुन्हा साकेत मैदानात येऊन संपन्न झाली. यानंतर सहभागींच्या उत्साहात भर घालण्यासाठी झुंबा डान्सचेही आयोजन करण्यात आले होते. मुंब्रा पोलीस विभागाच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) ज्योतीराम व्हनमाने, पोलीस अंमलदार सुरेश कोळेकर, अमृत पाटील आणि किशोर माने यांनी या सायकल रॅलीत सहभाग घेत विभागाचे प्रतिनिधित्व केले. सर्वांनी उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध सहभाग नोंदवत फिट इंडिया अभियानाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. मुंब्रा पोलीस विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत ठाणे पोलीस आयुक्तांनी त्यांचा विशेष सन्मान केला. या गौरवामुळे विभागात आनंदाचे वातावरण असून वरिष्ठ अधिकारी व सहकाऱ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. यावेळी नियमित व्यायाम, सायकलिंग आणि शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. फिट इंडिया अभियानाच्या माध्यमातून समाजात आरोग्यदायी जीवनशैलीबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# उल्हासनगरात वालधुनी नदीची सफाई संकटात

**■ उल्हासनगर (प्रथमेश चव्हाण) :** उल्हासनगर शहरातुन वाहणाऱ्या वालधुनी नदीला सध्या नाल्याचे स्वरुप आले आहे. ऐकेकाळी शुध्द पाणी असलेली ही नदी एखाद्या गटार गंगे प्रमाणे वाहत आहे. या नदीला दरवर्षी साफ करण्यात येते , परंतु नदीतील गाळ व कचरा काठावरच टाकन्यात येत असल्याने तो गाळ व कचरा पुन्हा नदीत गेल्याने नदीची सफाई ही संकटात सापडली आहे. शुभम कंपनीला सफाईचा ठेका दिल्याने नदीतील गाळ व कचरा कशा प्रकारे काढुन महापालिकेला थुक लावन्याची कला कंपनीचे मालक शशांक मिश्रा याला अवगत झाली आहे. उल्हासनगर शहरातुन वाहणाऱ्या वालधुनी नदीची सफाई सध्या संकटात सापडली आहे. नदीचे भव्य असे



असलेले पात्र रेल्वे वाल्यानी नवीन ट्रॅक टाकन्याच्या कामामुळे लहान करुन ठेवले आहे. तर उल्हासनगर अंबरनाथ च्या मध्यभागी रेल्वे वाल्यानी नवीन ट्रॅक टाकण्यासाठी वालधुनी नदी पात्रात मोठ्या प्रमाणात भराव केला आहे. या भरावामुळे नदीचे पात्र एकदम लहान झाले आहे. दरम्यान हा भराव काढला नाही , तर पावसात नदीच्या पुरामुळे सम्राट अशोक नगर , वडोल गाव , रेणुका सोसायटी या परिसरातील घरे डुबण्याची शक्यता आहे. तेव्हा महापालिकेने ताबडतोब तो भराव शुभम कंपनी मार्फत काढुन नदी पात्र रुंद करण्याची मागणी परिसरातील नागरिक करत आहेत. दरम्यान स्टेशन पासुन ते शांतीनगर पर्यंत नदीची सफाई व्यवस्थित होत नसुन शुभम वाला मिश्रा फक्त थातुर मातुर सफाई करुन नदीमध्ये कचरा तसाच ठेवत असल्याचे दिसुन येत आहे. उल्हासनगर महापालिकेने काळ्या यादीत टाकलेल्या ठेकेदाराला पुन्हा सफाईचा ठेका दिला आहे. दरवर्षी तीन वेळा नदीच्या सफाई सह शहरातील लहान मोठे नाले सफाई करण्याचा आदेश आहे . मात्र हा शुभम वाला मिश्रा या आदेशाला हरताळ फासत आहे. दरम्यान वालधुनी नदीची सफाई ही महत्वाची असुन या नदीला नाल्याच्या पात्रातुन नदीच्या पात्रात आणायचे आहे. दरवर्षी नदीच्या विकासाठी करोडो रुपयाचा निधी बजेटमध्ये असतो , परंतु तो निधी जातो कुठे हे समजत नाही.

# विकलांगता मुक्त पालघरसाठी कटिबद्ध – खा. डॉ. हेमंत सवरा

**■ पालघर (सचिन कदम) :** विकलांगता मुक्त पालघर अभियानांतर्गत १८ वर्षे पर्यंत वयोगट अस्थिव्यंग रुग्ण तपासणी शिबिर जिल्हा रूग्णालय पालघर येथे पार पडले.विष्णु सवरा सामाजिक न्यास, इनस्टिट्यूट ऑफ पेडियाट्रिक डिसऑर्डर्स मुंबई व मुस्कान चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी खासदार डॉ. श्री हेमंत विष्णु सवरा यांनी वरील संकल्प जाहीर केला. महाराष्ट्र राज्याचे माजी आदिवासी विकासमंत्री स्व. विष्णु रामा सवरा यांच्या नावाने स्थापन करण्यात आलेल्या विश्वस्त न्यासाच्या माध्यमातून पालघर लोकसभा क्षेत्रात विविध समाज उपयोगी उपक्रम राबवण्याची मुहूर्तमेढ या शिबिराने आज पालघरमध्ये रोवली गेली. उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी भरतभाई राजपूत भाजपा जिल्हाध्यक्ष, मातोश्री श्रीमती जयश्रीताई सवरा, प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. तरल नागदा, भाजपाचे जेष्ठ नेते बाबाजी काठोळे,कुंदन संखे शिवसेना जिल्हाध्यक्ष, उत्तम घरत नगराध्यक्ष पालघर, डॉ.मराड, डॉ. जयदीप ढमेले, भावानंद संखे, ॲड जयेश आव्हाड , वाडा नगराध्यक्षा सौ रिमाताई गंधे, कैलास म्हात्रे ,निशाताई सवरा आदी मान्यवर उपस्थित होते. पालघर जिल्ह्यातून एकूण १८२ अस्थी विकलांग रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. यापैकी ६२ रुग्णांवर आवश्यक शस्त्रक्रिया ज्युपिटर हॉस्पिटल ठाणे



येथे करण्यात येणार आहेत. ४० रुग्णांना कृत्रिम अवयव व सहाय्यक साधनांच्या माध्यमातून विकलांगतेवर मात करण्यासाठी मदत करण्यात येणार आहे. प्रत्येक तालुक्यापासून पालघर शहरा पर्यंत मोफत प्रवास सेवा, नाश्ता- भोजन, तातडीचा औषध उपचार अशा सर्व सुविधा विष्णू सवरा सामाजिक न्यास यांच्या माध्यमातून पुरवण्यात आल्या. पालघर जिल्हा आरबीएसके टीम यांच्या माध्यमातून रुग्ण संपर्क व इतर बहुमोल सहकार्य शिबिरामध्ये लाभले. शिबिराचे आयोजन व नियोजन याबाबत रुग्णांचे नातेवाईक उपस्थित पाहुणे व मान्यवर यांनी खा.डॉ. हेमंत सवरा व त्यांचे पक्ष सहकारी, मित्र मंडळ यांचे अभिनंदन केले. भविष्यात पालघर जिल्हा विकलांग मुक्त करण्यासाठी विकलांगतेच्या सर्व समस्यांवर कालबद्ध कार्यक्रम राबवण्यासाठी विष्णु सवरा सामाजिक न्यास सोबत अखंड काम करत राहणार, अशी आश्वासक भावना डॉ तरल नागदा यांनी व्यक्त केली.

# धुंदलवाडी आरोग्य उपकेंद्र रात्रीच्या वेळी बंद, रुग्ण त्रस्त




**■ पालघर (रघुनाथ कदम) :** डहाणू तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा उघडकीस आला असून, धुंदलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र रात्रीच्या वेळी बंद राहत असल्यामुळे आरोग्य व्यवस्थेचे तीनतेरा वाजले आहेत. विशेष म्हणजे, गरोदर महिला, अपघातग्रस्त किंवा गंभीर रुग्णांना रात्रीच्या वेळी तातडीची वैद्यकीय सेवा मिळणे कठीण झाले आहे. धुंदलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्राची नव्या इमारतीचे बांधकाम सुरू असल्याने हे केंद्र सध्या येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. मात्र, स्थलांतरानंतरही नागरिकांना नियमित आरोग्य सेवा मिळत नसल्याचे ग्रामस्थाचे म्हणणे आहे. माहितीनुसार, उपकेंद्र संध्याकाळनंतर बंद केले जाते. रात्री डॉक्टर, नर्स किंवा अन्य कर्मचारी उपलब्ध नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. या उपकेंद्रावर बहारे, धुंदलवाडी, हळदपाडा, वंकास, पुजावे, सासवंद आदी गावांतील नागरिक अवलंबून आहेत. मात्र रात्रीच्या वेळी आरोग्य सुविधा बंद राहत असल्यामुळे नागरिकांना जीव मुठीत धरून दूरच्या रुग्णालयांचा आधार घ्यावा लागत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

**सावेजानिक बांधकाम विभाग**

**निविदा सूचना क्र. १५ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रामजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई-४०० ००१ दुरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४/७६ हे खालील कामे **सा.बां. विभाग सुशिक्षित बेरोजगार अभियंता, यांचेसाठी मागवित आहेत.** कोऱ्या निविदेचा नमुना कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई यांचे कार्यालयातून **दि. ०५/०६/२०२६ ते दि. १२/०६/२०२६ दुपारी १५.०० पर्यंत देण्यात यईल. भरुन पाठविलेल्या निविदा दि. १५/०६/२०२६ रोजी त्यादिवशी दुपारी १५.०५ वाजेपर्यंत** स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नाव | अंदाजित किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | वर्ग | काम पूर्णकरण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | को-या निविदा नमुन्याची किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | MOW to plaster and painting of lift no 1 to 8 corridor at Hospital building on 2nd floor at J. J. Hospital Compound, Mumbai. | ८०६४२७/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| २ | MOW to plaster and painting of lift no 3 to 7 Corridor at Hospital building on 3rd floor at J. J. Hospital Compound, Mumbai. | ८३७९०६/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ३ | MOW to plaster and painting of lift no 4 to 7 passage at Hospital building on 1st floor at J. J. Hospital Compound, Mumbai. | ८१४१६५/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ४ | Refurbishment of departmental cabins at 3rd floor at Hospital Building at Sir J. J. Hospital Compound, Mumbai. | ८३९४१४/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ५ | Repairs and renovation Grant medical college department at Admin Building at Sir J. J. Group of Hospital, Mumbai. | ८९५६६३/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ६ | Alteration of post graduate doctor library at residential doctor quarters building at Sir J.J Hospital Compound, Mumbai. | ८३९३०३/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ७ | Repairs and provide to purchase department at Admin Building at J. J. Hospital Compound, Mumbai. | ९११६२३/- | १००००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ८ | Refurbishment of doctor's room at fourth floor at residential doctor quarters building at Sir J.J Hospital Compound, Mumbai. | ८४४४९४/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ९ | Repairs and renovation of nursing department at Administrative Building at Sir J. J. Group of Hospital, Mumbai. | ७३४३०१/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १० | Upgradation of post graduate doctor rooms 1st, 2nd and 3rd floor at residential doctor quarters building at Sir J.J. Hospital Compound, Mumbai. | ८३४११२/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ११ | Upgradation and renovation of New Administrative Building 1st floor J. J. department at J. J. Hospital Compound, Mumbai. | ८१८९३८/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

**जा.क्र.एघ(सा.बा)वि/निविदा/** ३५२९
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६
दिनांक : ४/६/२०२६

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
फोर्ट, मुंबई.

आरओसी - 2026-27/क्र-5/C१०३७

# दुर्गराज रायगडावर शिवराज्याभिषेक दिनाचा दिमाखदार सोहळा

## वैदिक मंत्रोच्चार, पालखी सोहळा, राजसदरावरील अभिषेक आणि शिवभक्तांच्या उत्स्फूर्त सहभागाने रायगड शिवमय

**रायगड (सचिन कदम) :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गराज रायगडावर आज इतिहास, परंपरा आणि शिवभक्तीचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. संभाजीराजे छत्रपती व त्यांच्या सुविद्य पत्नी संयोगिताराजे भोसले आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच देशभरातून हजारो शिवप्रेमींनी उपस्थिती लावली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने संपूर्ण रायगड परिसर दुमदुमून गेला. यावेळी आमदार संजय चव्हाण, आमदार अभिजित पाटील, नवनिर्वाचित आमदार अनिकेत तटकरे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उप जिल्हाधिकारी रवींद्र शेळके यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शिवराज्याभिषेक दिनी सकाळी ७ वाजता नागारखान्यात युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या शुभहस्ते पारंपरिक वाद्यांच्या गजरात ध्वजारोहण संपन्न झाले. सकाळी





७.३० वाजता राजसदर येथे शाहिरी कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीचे राजसदरावर आगमन झाले. त्यानंतर युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे आगमन झाले आणि त्यांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या उत्सवमूर्तीचा अभिषेक करण्यात आला. श्री शिवछत्रपती महाराजांच्या राजसदरेवरील सिंहासनारुढ मूर्तीस सुवर्ण मुद्रांचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर पोलीस दलाच्या वतीने शासकीय मानवंदना देण्यात आली. युवराज संभाजी छत्रपती महाराज शिवभक्तांना संबोधित केले. शिवराज्याभिषेक पालखी सोहळ्यास प्रारंभ होऊन जगदीश्वर मंदिरात पोहचली. जगदीश्वर मंदिर येथे युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्याकडून वारकरी संप्रदायाला पंढरपूर वारीसाठी मानाचा ध्वज प्रदान करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांना सामूहिक अभिवादन करण्यात आले. नियोजित कार्यक्रमानुसार सकाळी पारंपरिक ढोल-ताशे, लेझीम, मर्दानी खेळ आणि भगव्या पताकांनी सजलेल्या या मिरवणुकीने शिवभक्तांमध्ये विशेष उत्साह निर्माण केला. त्यानंतर राजसदरावर आयोजित मुख्य सोहळ्यात संभाजीराजे छत्रपती यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. दुपारी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, पोवाडे, कीर्तन, शिवचरित्रावर आधारित व्याख्याने आणि लोककलांचे सादरीकरण करण्यात आले. अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमांना शिवभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पारंपरिक वेशभूषेतील युवक-युवती, मावळे आणि विविध सामाजिक संस्थांच्या सहभागामुळे संपूर्ण रायगड परिसर शिवकालीन वातावरणाने भारावून गेला होता. सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले होते. शिवप्रेमींसाठी मोफत बससेवा, अन्नछत्र, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, स्वच्छता व्यवस्था, सावलीसाठी मंडप आणि आपत्कालीन सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. किल्ल्यावर कडक पोलीस बंदोबस्त ठेवून सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात आली. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह होळीचा माळ येथील नियंत्रण कक्ष, जगदीश्वर मंदिर, छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी, राजसदर आणि अन्नछत्राची पाहणी करून व्यवस्थेचा आढावा घेतला. त्यांनी शिवभक्तांशी संवाद साधून त्यांच्या सोयी-सुविधांची विचारपूस केली तसेच सर्व यंत्रणांना आवश्यक सूचना दिल्या. स्वराज्याच्या वैभवशाली इतिहासाचे स्मरण करून देणारा आणि शिवरायांच्या विचारांचा जागर करणारा हा शिवराज्याभिषेक सोहळा अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. दुर्गराज रायगडावर आज पुन्हा एकदा शिवकालीन तेज, शौर्य आणि स्वाभिमानाचा जागर अनुभवायला मिळाला.

# अरिझोनात 'शिवराज्याभिषेक सोहळा २०२६' उत्साहात

## शिवविचारांचा भगवा सातासमुद्रापार!

**महाड (धनश्री सट्टा) :** छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास आणि त्यांनी निर्माण केलेल्या हिंदवी स्वराज्याचा वारसा आता खऱ्या अर्थाने सातासमुद्रापार पोहोचला आहे. अमेरिकेतील अरिझोना या राज्यात यंदा प्रथमच भव्य 'शिवराज्याभिषेक सोहळा २०२६' अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. 'शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय परिवार' (स्मॅप फिनिक्स) यांच्या वतीने आयोजित या कौतुकास्पद उपक्रमामुळे परदेशातही महाड, रायगडचा ऐतिहासिक वारसा आणि शिवअस्मिता जागतिक पातळीवर पोहोचवण्याचे काम यशस्वीपणे झाले आहे. या वैशिष्ट्यपूर्ण आणि ऐतिहासिक सोहळ्याच्या आयोजनासाठी अमेरिकेच्या फिनिक्स येथील शिर्डी साईबाबा मंदिराच्या प्रसाद हॉलची निवड करण्यात आली होती. अनेक वर्षांपासून मातृभूमी भारतापासून दूर असलेल्या आणि विशेषतः महाराष्ट्राच्या मातीशी आपली नाळ घट्ट जोडून ठेवलेल्या हजारो मराठी बांधवांनी व भारतीय नागरिकांनी या सोहळ्यासाठी अलोट गर्दी केली होती. पारंपरिक वेशभूषा, कपाळावर चंद्रकोर आणि हातामध्ये भगवे ध्वज घेऊन आलेल्या अबालवृद्धांमुळे काही काळासाठी संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. कार्यक्रमाच्या



सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत 'जय भवानी, जय शिवाजी' अशा गगनभेदी जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणून महाड येथील रहिवासी, आयटी इंजिनिअर आणि प्रसिद्ध इतिहास व दुर्ग अभ्यासक सिद्धेश सुर्वे यांना मुख्य व्याख्याते म्हणून खास निमंत्रित करण्यात आले होते. रायगडावरील प्रत्यक्ष शिवराज्याभिषेक आणि शंभु राज्याभिषेक सोहळ्याचा प्रदीर्घ मैदान-अनुभव असलेल्या सिद्धेश सुर्वे यांचे अमेरिकेच्या भूमीवरील हे शिवचरित्रावरील पहिलेच जाहीर व्याख्यान होते. त्यामुळे तेथील अनिवासी भारतीयांमध्ये या कार्यक्रमाबाबत आधीपासूनच प्रचंड उत्सुकता निर्माण झाली होती. त्यांनी आपल्या ओघवत्या आणि अभ्यासपूर्ण शैलीत शिवरायांचे व्यवस्थापन कौशल्य आणि त्यांचे जागतिक विचार मांडून उपस्थित जनसमुदायाला मंत्रमुग्ध केले. या ऐतिहासिक सोहळ्यात मुख्य व्याख्याते सिद्धेश सुर्वे यांनी, "पूर्वी समुद्र ओलांडला की धर्म बदलतो ही समजूत छत्रपती शिवाजी महाराजांनी समुद्राच्या तळाशी गाडत स्वतःचे आरमार उभे केले; अगदी तसेच आज आम्ही ती समजूत मागे टाकत अमेरिकेत पहिल्यांदाच शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करून शिवविचारांचा जागर केला आहे," असे ठाम विचार मांडले. त्यांच्या या प्रेरणादायी विधानाने उपस्थित सर्व शिवभक्तांमध्ये एक नवा उत्साह, ऊर्जा आणि मातृभूमीबद्दलचा अभिमान संचारला होता. परदेशात जन्माला येत असलेल्या नवीन पिढीला आपल्या गौरवशाली इतिहासाची आणि पूर्वजांच्या पराक्रमाची ओळख व्हावी, तसेच आपली संस्कृती टिकून राहावी या उदात्त उद्देशाने 'स्मॅप फिनिक्स' परिवाराने या सोहळ्याचे नेटके नियोजन केले होते.

# आरक्षित जागेवर २० दिवसांत दोन मजली इमारत

**कोल्हापूर (प्रथमेश चव्हाण) :** तावडे हॉटेल परिसरातील बेकायदेशीर बांधकामांवर कारवाईची प्रक्रिया सुरू असतानाच उचगाव ग्रामपंचायतीच्या कारभारातील गंभीर अनियमितता समोर आली आहे. ट्रक टर्मिनस, कचरा डेपो आणि नो डेव्हलपमेंट झोनसाठी आरक्षित असलेल्या जागेवर अवघ्या २० दिवसांच्या कालावधीत दोन मजली आरसीसी इमारतीसाठी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र आणि पूर्णत्वाचा दाखला (कम्प्लीशन सर्टिफिकेट) देण्यात आल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. बांधकाम क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, अवघ्या २० दिवसांत दोन मजली आरसीसी इमारतीचे बांधकाम पूर्ण करणे व्यवहार्य नसताना ग्रामपंचायतीने दिलेल्या परवानग्यांमुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणामुळे ग्रामपंचायतीच्या बांधकाम मंजुरी प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबतही शंका व्यक्त केल्या जात आहेत. सर्वोच्च न्यायालयाने २२ एप्रिल रोजी दिलेल्या निकालात कोल्हापूर ते गांधीनगर



मार्गावरील तावडे हॉटेल परिसरातील संबंधित जागा महापालिकेच्या मालकीची असल्याचे स्पष्ट केले आहे. शहराच्या भविष्यातील विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या १५८ एकर क्षेत्रातील २३.५ एकर जागा ट्रक टर्मिनससाठी, तर ११ एकर जागा कचरा डेपोसाठी आरक्षित ठेवण्यात आली आहे. उर्वरित क्षेत्र नो डेव्हलपमेंट झोनमध्ये मोडत असल्याने तेथे कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यास कायदेशीर मर्यादा आहेत. मात्र, या निर्बंधांकडे दुर्लक्ष करून संबंधित भागात अनेक बांधकामे उभारण्यात आल्याचे समोर आले आहे.

# सातारा जिल्ह्यात वनाचा सौदा करून पर्यावरण दिन साजरा– महारुद्र तिकुंडे

**सातारा (महेश पानसरे) :** वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे असे संतांनी सांगून प्रबोधन केले होते. आज सातारा जिल्हा म्हणजे वृक्षतोड आम्हा सोयरे... धन दांडगे चरे.. असे झाले आहे. त्यामुळे दोन दिवसांपूर्वी जगभर जागतिक पर्यावरण दिन साजरा झाला पण साताऱ्यात वनविभागाच्या दुर्लक्षितपणाने पर्यावरण दीन साजरा झाल्याची टीका सामाजिक कार्यकर्ते महारुद्र तिकुंडे व माहिती अधिकार कार्यकर्ते कपिल राऊत यांनी केली आहे. नैसर्गिक वरदान लाभलेल्या सातारा जिल्ह्यामध्ये दुष्काळी भागातही मोठ्या प्रमाणात वृक्षवल्ली आहे. त्यामुळे लोकांना नैसर्गिक आनंद व सावली मिळते. परंतु अलीकडच्या काळामध्ये विकासाच्या नावाने वृक्षाची कत्तल सुरू आहे. वनविभाग खऱ्या अर्थाने जागृती




करण्यास अपयशी ठरले आहे. सामान्य ग्रामस्थ खेड्यापाड्यातून जन आंदोलन करत असताना वन विभाग मात्र निर्धास्त आहे. असे अनुभव घेतलेले ग्रामस्थ सांगत आहे. पूर्वी सातारा जिल्हात वन विभागाच्या अधिकाऱ्याच्या कर्तव्यदक्षतेमुळे अनेक वृक्ष आजही दिमाखात उभे आहेत. अलीकडच्या काळात उलट हिरव्यागार वनराईतून आलेल्या अधिकारी बदली झाल्यानंतर उजाड माळरानावरून जात असल्याचा करिष्मा घडणार आहे. ही प्रशासनाची प्रगती का अधोगती? असा प्रश्न सामान्य माणसांना पडला आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते श्री तिकुंडे व राऊत यांनी तर वनविभागाच्या अधिकाऱ्यांना खास बाब म्हणून प्रतिनियुक्तीवर वखार महामंडळावर नियुक्ती करावी. अशी अफलातून मागणी केली आहे. सातारा जिल्ह्यातील जावळी, महाबळेश्वर, पाटण, वाई, कास पठार व कराड सारख्या निसर्गरम्य ठिकाणी पूर्वी सुमारे तीन ते चार लाख जुनी झाडे रस्त्यालगत होती. आता ती दोन लाखावर आली असावी. असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड असूनही वन विभागाने कोणतीच कार्यवाही केलेली नाही. यामुळे वन विभागाचे क्षेत्र वाढवण्यास वन अधिकारी सातारा जिल्ह्यात नेमतात का झाडं तोडण्यासाठी? असा मार्मिक प्रश्न चुकून त्यांनी विचारला आहे. माहितीच्या अधिकाराचा वापर करूनही वन अधिकारी कार्यालयात सापडत नाहीत. एवढा त्यांच्या पाठीशी कुणाचा वरद हस्त आहे. याचा शोध घेणे गरजेचे आहे. दरम्यान, या प्रश्नाबाबत आता तीव्र आंदोलन केले जाईल. असा इशारा श्री महारुद्र तिकुंडे व कपिल राऊत यांनी दिला आहे. दरम्यान, याबाबत संबंधित वन अधिकाऱ्याची भेट घेण्याचा प्रयत्न केला होता. ते व्हिजिटला गेले असून तशा पद्धतीने हालचाल पुस्तिकेत नोंद आढळली नसल्याचीही माहिती काहींनी दिली आहे.

# रायगड मधील मच्छिमार संस्था संकटात

## डिझेलच्या अतिरिक्त दरवाढीचा फटका

**रायगड (सचिन कदम) :** युद्धजन्य परिस्थितीचे कारण पुढे करत डिझेलच्या दरात करण्यात आलेल्या भरमसाठ वाढीमुळे रायगड जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी संस्था अभूतपूर्व आर्थिक संकटात सापडल्या आहेत. खासगी पंपावर ९२ ते ९४ रुपये प्रतिलीटर दराने मिळणारे डिझेल मच्छिमार संस्थांना तब्बल १५३ रुपये प्रतिलीटर दराने खरेदी करावे लागत असल्याने संस्थांचा आर्थिक गाडा विस्कळीत झाला आहे. ना नफा, ना तोटा या तत्त्वावर चालणाऱ्या संस्थांचे व्यवहार ठप्प होण्याच्या मार्गावर असून, अनेक संस्थांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने हस्तक्षेप करून डिझेल दरवाढ मागे घ्यावी, अन्यथा मच्छिमार क्षेत्राला मोठा फटका बसण्याची भीती रायगड जिल्हा मच्छिमार सहकारी संघाने व्यक्त केली आहे. रायगड जिल्हा मच्छिमार सहकारी संघाचे अध्यक्ष प्रल्हाद पाटील व उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी ही गंभीर बाब मांडत शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खासदार शरद पवार यांना निवेदन दिले आहे. प्रल्हाद पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, रायगड जिल्ह्यात ४० मच्छिमार सहकारी संस्थांकडे डिझेल पंप आहेत. या संस्थांमार्फत १ हजार ९६१ मासेमारी नौकांना डिझेल पुरवठा केला जातो. शासनाकडून या संस्थांना वर्षाकाठी सुमारे ४७ हजार ८४० किलोलीटर



डिझेलचा कोटा मंजूर आहे. समुद्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या मच्छिमारांना सवलतीच्या दरात डिझेल उपलब्ध करून देण्याची जबाबदारी या संस्थांवर आहे. मासेमारी हा कृषी क्षेत्राशी निगडित व्यवसाय असून, हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह त्यावर अवलंबून आहे. शिवाय, मासेमारीतून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळवून देत देशाच्या अर्थव्यवस्थेलाही हातभार लागतो. मात्र, शासनाने मच्छिमार सहकारी संस्थांची वर्गवारी आजही घाऊक ग्राहक (बल्क कन्झ्युमर) म्हणून कायम ठेवल्याने हा संपूर्ण प्रश्न निर्माण झाला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. १७ मार्चपासून डिझेलच्या दरात झालेल्या वाढीनंतर ऑईल कंपन्यांकडून मच्छिमार संस्थांना सुमारे १५३ रुपये प्रतिलीटर दराने डिझेल घ्यावे लागत आहे. दुसरीकडे खासगी पंपावर हेच डिझेल ९२ ते ९४ रुपये दराने उपलब्ध आहे. त्यामुळे प्रत्येक लीटरमागे ५० ते ६० रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार संस्थांवर पडत आहे. या वाढीव दरामुळे मच्छिमार संस्थांमधील डिझेल पंपांवरून डिझेल खरेदी करणे मच्छिमारांना परवडेनासे झाले आहे. परिणामी, गेल्या अनेक दिवसांपासून अनेक संस्थांनी डिझेल खरेदीच केलेले नाही. त्यामुळे संस्थांचे आर्थिक व्यवहार जवळपास ठप्प झाले असून, भविष्यात अनेक संस्था बंद पडण्याची भीती व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, कर्नाटक राज्यात मच्छिमारांना व्हॅट वजा करून डिझेल उपलब्ध करून दिले जाते. गुजरातमध्येही पूर्वीप्रमाणेच डिझेल पंपाच्या दरात मच्छिमारांना डिझेल मिळत आहे. मग महाराष्ट्रातील मच्छिमारांनाच वेगळा न्याय का, असा सवाल प्रल्हाद पाटील यांनी उपस्थित केला आहे. आधीच वारंवार येणारी वादळे, अवकाळी पाऊस, बदलते हवामान आणि घटते मासेमारी उत्पन्न यामुळे मच्छिमार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यातच डिझेल दरवाढीच्या नव्या संकटामुळे अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून डिझेल पुरवठा विस्कळीत झाल्याने झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी तसेच पूर्वीप्रमाणेच डिझेल दर लागू करावेत, अशी मागणी रायगड जिल्हा मच्छिमार सहकारी संघाने केली आहे. या मागण्यांसाठी शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील तसेच राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांना निवेदन सादर करण्यात आले असून, शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास मच्छिमार क्षेत्रात तीव्र असंतोष निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# मोफत वाळू योजनेला नाशिक विभागात प्रतिसाद

**नाशिक (अकिल शेख) :** घरकुल योजनांतील लाभार्थ्यांना बांधकामासाठी आवश्यक असलेली वाळू सहज, पारदर्शक आणि कमी खर्चात उपलब्ध करून देण्यासाठी महसूल विभागाने सुरू केलेल्या मोफत वाळू वितरण योजनेला नाशिक विभागात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विभागीय प्रशासनाच्या प्रभावी नियोजनामुळे हजारो लाभार्थ्यांना घरबांधणीसाठी आवश्यक वाळू उपलब्ध झाली असून, ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांच्या घराच्या स्वप्नांना प्रत्यक्ष आकार मिळत आहे. महसूल विभागाच्या विविध योजनांचा आढावा विभागीय आयुक्तांकडून नियमितपणे घेतला जात असून, पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. उपलब्ध आकडेवारीनुसार, विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये घरकुल योजनांअंतर्गत ४४ हजारांहून अधिक लाभार्थ्यांना या उपक्रमाचा फायदा झाला आहे. नाशिक, धुळे, नंदुरबार,



जळगाव आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील लाभार्थ्यांना घरबांधणीसाठी मोफत वाळू उपलब्ध करून देण्यात आली आहे. शासनाच्या आदेशानुसार प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना तसेच इतर शासकीय घरकुल योजनांतील पात्र लाभार्थ्यांना प्रत्येकी पाच ब्रास वाळू पूर्णपणे मोफत दिली जाते. याशिवाय इतर बांधकामांसाठी महिन्यातून एकदा १,३०० रुपये प्रति ब्रास दराने दहा ब्रास वाळू उपलब्ध करून देण्याची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे बांधकामाचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी झाला असून लाभार्थ्यांना आर्थिक दिलासा मिळत आहे. नाशिक जिल्ह्यात या योजनेचा सर्वाधिक लाभ झाला आहे. जिल्ह्यात १,२७१ लाभार्थ्यांना ११ हजार ३५५ ब्रास वाळूचे वितरण करण्यात आले. तसेच २,१८१ नागरिकांनी ऑनलाइन परवानगी घेतली असून सहा हजारांहून अधिक लाभार्थ्यांना अधिकाऱ्यांमार्फत थेट लाभ देण्यात आला आहे. ग्रामविकास अधिकाऱ्यांमार्फत मोफत वाळूची रॉयल्टी पावती लाभार्थ्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी महाखनिज ॲप किंवा महसूल विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी करावी लागते. कळवण तालुक्यातील तीन वाळू गटांमध्ये सध्या ६,७१० ब्रास वाळू उपलब्ध असून त्यापैकी ६७१ ब्रास वाळूचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित वाळूचे वितरण ९ जूनपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे. मात्र, देवळा येथील एका वाळू गटाला ग्रामस्थांचा विरोध असल्याने त्याचा प्रश्न अद्याप प्रलंबित आहे.

# कुंभमेळ्यामुळे त्र्यंबकेश्वरमध्ये जमिनींना 'शाही' भाव; किमतींमध्ये प्रचंड वाढ!

**नाशिक (अभिजीत येरल्लू) :** पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू असून त्याचा थेट परिणाम स्थानिक स्थावर मालमत्ता बाजारावर होताना दिसत आहे. भाविकांच्या सुविधांसाठी कोट्यवधी रुपयांची पायाभूत विकासकामे हाती घेण्यात आल्याने परिसराचा वेगाने कायापालट होत आहे. यामुळे जमीन, भूखंड, सदनिका आणि फार्म हाऊस यामध्ये गुंतवणूक वाढली असून मालमत्तांचे दरही झपाट्याने वाढले आहेत. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या आणि कुंभनगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या त्र्यंबकेश्वरमध्ये धार्मिक पर्यटन हेच अर्थकारणाचे प्रमुख केंद्र आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह बाहेरील गुंतवणूकदारही हॉटेल, लॉजिंग, रिसॉर्ट आणि निवास व्यवस्थेशी संबंधित प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करत आहेत. सुमारे २० हजार लोकसंख्या असलेल्या त्र्यंबकेश्वरमध्ये कुंभमेळ्यादरम्यान लाखो भाविक दाखल होण्याची शक्यता लक्षात घेऊन निवास सुविधांचा विस्तार वेगाने होत आहे. स्थानिकांच्या मते, सध्या त्र्यंबकेश्वर परिसरात जमिनींचे दर २५ ते ३० लाख रुपये प्रति गुंठा इतके झाले आहेत. दोन वर्षांपूर्वी हेच दर १० ते १२ लाख रुपये प्रति गुंठा होते. त्यामुळे अल्पावधीतच जमिनींच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्र्यंबकेश्वरच्या भौगोलिक मर्यादांमुळे गावाचा विस्तार मर्यादित असला तरी विकास आराखड्यानंतर आसपासच्या भागात बांधकामांना वेग आला आहे. २०१५-१६ मध्ये तयार झालेल्या विकास आराखड्यानंतर पेगलवाडी, गणपतबारी, मेढघर किल्ला परिसर आणि इतर भागांमध्ये नवीन निवासी तसेच व्यावसायिक प्रकल्प उभे राहत आहेत. कैलासराजा नगर, पुरोहित नगर आणि दक्षिणमुखी हनुमान मंदिर परिसरात नव्याने वसाहती विकसित झाल्या असून बहुमजली इमारती आणि रो-हाऊसना मोठी मागणी निर्माण झाली आहे. अनेक कृषी जमिनी बिनशेती करून भूखंडांच्या विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. मुसळधार पावसासाठी ओळखल्या जाणाऱ्या या तालुक्यात बेजे, पहिणे आणि निसर्गरम्य परिसरात फार्म हाऊस, रिसॉर्ट, योग केंद्र आणि निसर्गोपचार केंद्रांची उभारणीही वाढली आहे.

### दस्त नोंदणी किती?

- २०२१-२२ – १७०७
- २०२२-२३ – १९०६
- २०२३-२४ – २४४८
- २०२४-२५ – २७०७
- २०२५-२६ – २३८५

नाशिक-त्र्यंबकेश्वर मार्गावर शेकडो हॉटेल, रिसॉर्ट आणि लॉजिंग सुविधा उभ्या राहिल्या आहेत. मात्र वाढत्या बांधकामांच्या पार्श्वभूमीवर अनेक प्रकल्प अधिकृत आहेत की अनधिकृत, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. नगरपालिकेकडून दिलेल्या परवानग्या आणि प्रत्यक्ष उभारण्यात येणाऱ्या बांधकामांमध्ये तफावत असल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सुरू असून त्याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# जून महिन्यात बॉलीवूडमध्ये चित्रपटांची गर्दी; बॉक्स ऑफिसवर मोठी स्पर्धा

**वृत्तसंस्था :** जून महिना सुरू झाला आहे आणि दरवर्षीप्रमाणे महिन्याचा पहिला शुक्रवार धमाकेदार सुरुवात करणार आहे. ' है जवानी तो इश्क होना है' हा मोठा हिंदी चित्रपट या शुक्रवारी प्रदर्शित होत असून, त्याची टक्कर बॉबी देओलच्या ' बंदर' आणि राम चरणच्या ' पेड्डी' या चित्रपटांशी होणार आहे . पुढच्या शुक्रवारी इम्तियाज अलीचा दिलजीत दोसांझ-शरवरी-वेदांग रैना अभिनीत 'मैं वापस आऊंगा' , मनोज बाजपेयीचा ' गव्हर्नर' , कंगना रणौतचा २६/११ वरील थ्रिलर ' भारत भाग्य विधाता' आणि विक्रम भट्टचा मिमोह चक्रवर्ती अभिनीत ३डी हॉरर चित्रपट ' हाउंटेड – इकोज ऑफ द पास्ट' प्रदर्शित होणार आहेत . 'कॉकटेल २' १९ जून रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असला तरी , अनेक कलाकार असलेला ' वेलकम टू द जंगल' हा विनोदी चित्रपट २६ जून रोजी प्रदर्शित होईल. दरम्यान, नामांकित स्टुडिओ निर्मित 'ही -मॅन अँड द मास्टर्स ऑफ द युनिव्हर्स', 'डिस्क्लोजर डे', 'टॉय स्टोरी ५' आणि 'सुपरगर्ल' यांसारखे हॉलिवूड चित्रपटही या महिन्यात मोठ्या पडद्यावर आपले नशीब आजमावतील. ४ शुक्रवार, ९ मोठे चित्रपट प्रदर्शित, १४०० कोटींहून अधिक कमाई पणाला: जून २०२६ हा बॉलिवूडचा आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि सर्वाधिक स्पर्धात्मक महिना ठरणार; व्यापार तज्ज्ञांनी धक्का व्यक्त केला: "यामुळे इतर चित्रपटांच्या व्यवसायावर परिणाम होईल, स्क्रीनसाठी चढाओढ लागेल." बॉलिवूड हंगामाच्या गणनेनुसार , केवळ हिंदी आणि पॅन-इंडिया चित्रपटांचा विचार केल्यास, या महिन्यात १,४०० कोटींहून अधिक रुपयांची उलाढाल पणाला लागली आहे. खरे तर, जून महिना हा बॉलिवूडसाठी आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि सर्वाधिक स्पर्धात्मक महिना ठरला आहे. दरम्यान, व्यापार तज्ज्ञ 'जेवढे जास्त, तेवढे चांगले' या उक्तीचा हवाला देत आनंद व्यक्त करत नाहीत. त्यांना भीती आहे की, एका आठवड्यात इतके चित्रपट प्रदर्शित झाल्यामुळे व्यवसायात विभागणी होऊ शकते आणि स्क्रीन शेअर करण्यासाठी चढाओढ सुरू होऊ शकते. व्यापार क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्व तरण आदर्श यांनी उसासा टाकत म्हटले, "आता तुम्ही कोणालाही थांबवू शकत नाही. प्रत्येक निर्मात्याचे हेच मत आहे की, ' मी पुढे का जाऊ ?'" तो पुढे म्हणाला, "माझ्यासाठी सर्वच चित्रपट महत्त्वाचे आहेत. प्रेक्षक कोणता



चित्रपट स्वीकारतील हे कधीच सांगता येत नाही. माझा प्रत्येक चित्रपट यशस्वी व्हावा अशी माझी इच्छा आहे. सगळ्यांचे पैसेही तर लागतातच . मात्र, चित्रपटसृष्टीत म्हटल्याप्रमाणे, स्क्रीनसाठी मारामारी होणारच ." व्यापार विश्लेषक अतुल मोहन म्हणाले, "हे धक्कादायक आहे. चित्रपट निर्माते त्यांच्या प्रदर्शनाचे नियोजन का करू शकत नाहीत? असे अनेक प्रसंग येतात जेव्हा आठवडेभर जास्त चित्रपट प्रदर्शित होत नाहीत. चित्रपट प्रदर्शन विखुरलेले असायला हवे होते. निर्मात्यांनी आधीच नियोजन करायला हवे होते. पण ते तसे करत नाहीत आणि नंतर ते स्क्रीनसाठी भांडतात. एका आठवड्यात २ चित्रपट पुरेसे आहेत. एका आठवड्यात ४ चित्रपट प्रदर्शित करणे योग्य नाही, कारण त्यामुळे प्रेक्षक विभागले जातील." वितरक आणि चित्रपटगृह मालक राज बन्सल यांनीही याच भावनेला दुजोरा देत म्हटले, "मला खूप धक्का बसला. मे महिन्यात जवळजवळ एकही चित्रपट प्रदर्शित झाला नव्हता आणि आता अचानक चित्रपटांचा पूर येणार आहे. हीच आमच्या चित्रपटसृष्टीची समस्या आहे – एक काळ चित्रपटांचा दुष्काळ असतो आणि त्यानंतर काही ठराविक शुक्रवारी चित्रपटांची एकच गर्दी होते." तो पुढे म्हणाला, "नक्कीच, यामुळे इतर चित्रपटांच्या व्यवसायावर परिणाम होईल आणि स्क्रीनसाठी चढाओढही सुरू होईल. वितरक त्यांच्या चित्रपटांसाठी अधिक शो मागतील आणि इतर चित्रपटांचे शो कमी करण्याचा प्रयत्न करतील. पण आता चित्रपटगृह मालक खूप हुशार झाले आहेत. ते सुरुवातीला एकाच स्क्रीनवर दोन चित्रपटांसाठी ॲडव्हान्स बुकिंग सुरू करतील. मग, ज्या चित्रपटाची जास्त तिकिटे विकली जातील, त्याला जास्त शो मिळतील." जून महिन्यात इतके चित्रपट का येतात? व्यापार तज्ज्ञांच्या मते, आयपीएल मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात संपत असल्यामुळे, क्रिकेट स्पर्धा अंतिम टप्प्यात असताना आणि प्रेक्षकसंख्या जास्त असण्याची शक्यता असताना, एक महिना आधी चित्रपट प्रदर्शित करण्याऐवजी निर्मात्यांना जूनमध्ये चित्रपट प्रदर्शित करण्यास प्रोत्साहन मिळते. अतुल मोहन म्हणाले, "आयपीएल हा एक घटक आहे. संध्याकाळी लोक घरी येतात आणि त्यांना सामन्यांचा आनंद घ्यायला आवडतो. याचा परिणाम प्रेक्षकांच्या संख्येवर होऊ शकतो." निर्माता आणि चित्रपट व्यवसाय विश्लेषक गिरीश जोहर यांनी स्पष्ट केले, "आयपीएल हे एक कारण आहे, पण पारंपरिकरित्या, चित्रपट प्रदर्शनाच्या बाबतीत उन्हाळ्याचे महिने अधिक सक्रिय असतात. बॉक्स ऑफिससाठी तीन कालावधी फायदेशीर मानले जातात – उन्हाळ्याचे महिने, दिवाळी आणि ख्रिसमस." तो पुढे म्हणाला, " कॉकटेल २ आणि वेलकम टू द जंगल हे चित्रपट आशादायक वाटत आहेत. बंदर आणि है जवानी तो इश्क होना है हे चित्रपटही चांगली कामगिरी करत आहेत. स्टीव्हन स्पीलबर्गचा डिस्क्लोजर डे सुद्धा पुढच्या शुक्रवारी येत आहे. हा एक छोटा चित्रपट आहे जो चांगली कमाई करू शकतो. थोडक्यात, प्रत्येक आठवड्यात पाहण्यासारखे आशादायक चित्रपट आहेत."

# आमिर खानच्या 'लगान' चित्रपटाच्या पुनर्मिलनाची योजना; चित्रपटाला २५ वर्षे पूर्ण; टीम मुंबईत पुन्हा एकत्र येणार

**वृत्तसंस्था :** आमिर खानच्या सर्वात गाजलेल्या चित्रपटांपैकी एक असलेला 'लगान' त्याच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त एक महत्त्वाचा क्षण साजरा करण्याच्या तयारीत आहे. भारत आणि परदेशातील प्रेक्षकांवर मोठा प्रभाव पाडणारा हा स्पोर्ट्स ड्रामा १५ जून रोजी २५ वर्षे पूर्ण करणार असल्याचे वृत्त आहे. दोन दशकांहून अधिक काळ लोटल्यानंतरही, हा चित्रपट आमिर खानच्या कारकिर्दीतील सर्वाधिक चर्चेत असलेल्या प्रकल्पांपैकी एक आहे. हा चित्रपट २००१ मध्ये प्रदर्शित झाला आणि नंतर त्याला जागतिक स्तरावर ओळख मिळाली. या चित्रपटाला अकादमी पुरस्कारासाठी नामांकनही मिळाले आणि तो त्याच्या काळातील महत्त्वपूर्ण चित्रपटांपैकी एक ठरला. अधिकृत समाप्ती तारखेच्या आधीच वर्धापनदिनाचे सोहळे सुरू होण्याची शक्यता आहे. 'बॉलिवूड हंगामा'च्या वृत्तानुसार, निर्माते हा प्रसंग साजरा करण्यासाठी अनेक उपक्रमांची तयारी करत आहेत. त्यामध्ये चित्रपटगृहांमध्ये पुन्हा प्रदर्शित करण्याचाही समावेश आहे, ज्यामुळे प्रेक्षकांना मोठ्या पडद्यावर चित्रपटाचा पुन्हा एकदा अनुभव घेण्याची संधी मिळू शकेल. पहा आमिर खानच्या लग्नाची तारीख जाहीर झाली आहे आणि ती तुमच्या अपेक्षेपेक्षाही जवळ आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा चित्रपट १२ जून रोजी पुन्हा प्रदर्शित होणार आहे. या निर्णयामुळे चित्रपटाशी संबंधित जुन्या आठवणींना उजाळा मिळेल आणि तरुण प्रेक्षकांना त्याची ओळख होईल, अशी अपेक्षा आहे. चाहत्यांनी सोशल मीडियावर या घडामोडीवर चर्चा सुरू केली आहे. चित्रपटगृहातील प्रदर्शनाव्यतिरिक्त, एका मोठ्या सोहळ्याचीही तयारी सुरू असल्याचे दिसते. बॉलिवूड हंगामाच्या वृत्तानुसार, आमिर खान चित्रपटाशी संबंधित लोकांसाठी मुंबईत एका रियुनियन कार्यक्रमाची तयारी करत आहे. हा कार्यक्रम १३ जून रोजी एका आलिशान हॉटेलमध्ये होण्याची शक्यता आहे. वृत्तानुसार, "ही पार्टी शनिवार, १३ जून रोजी मुंबईतील एका



पंचतारांकित हॉटेलमध्ये आयोजित केली जाईल. या पार्टीसाठी 'लगान'च्या संपूर्ण टीमला आमंत्रित करण्यात आले आहे. यामध्ये केवळ मुख्य आणि सहाय्यक कलाकारच नव्हे, तर युनिटमधील प्रत्येक सदस्य आणि चित्रपटासाठी योगदान देणारे इतर लोकही सामील आहेत. संपूर्ण टीमसाठी हे एक मोठे रियुनियन असेल आणि ते जुन्या आठवणींना उजाळा देतील व 'लगान'शी संबंधित त्यांच्या खास आठवणींना उजाळा देतील." हा कथित सोहळा केवळ एका पारंपरिक रियुनियनपुरता मर्यादित न राहता, पडद्यामागे योगदान देणाऱ्या लोकांनाही एकत्र आणेल अशी अपेक्षा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आमिर खान या कार्यक्रमाची आतुरतेने वाट पाहत आहे. अहवालानुसार, आमिर या मेळाव्याबद्दल आणि या प्रोजेक्टवर काम केलेल्या लोकांशी पुन्हा संपर्क साधण्याच्या संधीबद्दल वैयक्तिकरित्या खूप उत्सुक आहे. अहवालात पुढे म्हटले आहे की, "आमिर खान ही पार्टी आयोजित करण्यासाठी आणि त्याच्या हृदयाच्या जवळ असलेल्या चित्रपटाचा उत्सव साजरा करण्यासाठी खूप उत्सुक आहे. तो टीमला भेटण्यासाठी आणि त्यांच्यासोबत धमाल करण्यासाठी आतुरतेने वाट पाहत आहे. ही नक्कीच एक अविस्मरणीय संध्याकाळ असेल." हा चित्रपट अभिनेत्याच्या सर्वात संस्मरणीय प्रोजेक्ट्सपैकी एक आहे आणि त्याच्या कारकिर्दीत त्याचे एक विशेष स्थान कायम आहे. व्यावसायिक घडामोडींव्यतिरिक्त, आमिर खान त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत राहिला आहे. अलीकडील वृत्तांनुसार, हा अभिनेता ५ जुलै २०२६ रोजी जवळचे मित्र आणि कुटुंबीयांच्या उपस्थितीत एका खाजगी समारंभात गौरी स्प्रॅटशी लग्न करू शकतो.

# भारताच्या टी-२० संघाचे नेतृत्व श्रेयस अय्यरकडे; युवा वैभव सूर्यवंशीला मोठी संधी


**वृत्तसंस्था :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आगामी आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासह २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय टी-२० संघाची घोषणा केली असून, संघाची धुरा श्रेयस अय्यर यांच्या खांद्यावर सोपविण्यात आली आहे. युवा आणि अनुभवी खेळाडूंचा समतोल साधत निवडलेल्या या संघात तरुण फलंदाज वैभव सूर्यवंशी याच्या समावेशाने क्रिकेट वर्तुळात विशेष चर्चा रंगली आहे. अलीकडील आयपीएल हंगामात तसेच देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरी करणाऱ्या वैभव सूर्यवंशीला प्रथमच भारतीय वरिष्ठ संघात स्थान मिळाले आहे. आपल्या आक्रमक फलंदाजीमुळे आणि दबावाखाली खेळण्याच्या क्षमतेमुळे त्याने निवड समितीचे लक्ष वेधून घेतले होते. या निवडीमुळे तो भारतीय संघात स्थान मिळवणाऱ्या सर्वांत युवा खेळाडूंपैकी एक ठरला आहे. संघनिवडीनंतर वैभवने भारतासाठी तिन्ही प्रकारच्या



क्रिकेटमध्ये खेळण्याचे स्वप्न असल्याचे सांगितले. संघाचे नेतृत्व स्वीकारणाऱ्या श्रेयस अय्यरसमोर मोठे आव्हान असणार आहे. आगामी मालिकांमध्ये युवा खेळाडूंना संधी देतानाच संघाची विजयी परंपरा कायम राखण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल. आयपीएल आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील अनुभवाच्या जोरावर अय्यर हे संघाला योग्य दिशा देतील, असा विश्वास क्रिकेट तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याला कामाच्या ताणाचे व्यवस्थापन आणि फिटनेस लक्षात घेऊन विश्रांती देण्यात आली आहे. त्याच्या अनुपस्थितीत युवा वेगवान गोलंदाज हर्षित राणा याचे संघात पुनरागमन झाले आहे. तसेच काही नवोदित खेळाडूंनाही संधी देण्यात आल्याने संघाच्या भविष्यातील बांधणीला प्राधान्य दिल्याचे स्पष्ट झाले आहे. आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या मालिकांद्वारे भारतीय संघ पुढील जागतिक स्पर्धांसाठी तयारी करणार आहे. नव्या नेतृत्वाखाली भारतीय संघाची कामगिरी कशी राहते आणि युवा खेळाडू या संधीचे सोने करतात का, याकडे आता क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# सावधान! रिकाम्या पोटी चुकूनही खाऊ नका 'ही' फळं

**वृत्तसंस्था : रिकाम्या पोटी (उपाशी पोटी) खाल्ल्यास ॲसिडिटी, पोटदुखी आणि रक्तातील साखरेची पातळी अचानक वाढवणारी काही प्रमुख फळे खालीलप्रमाणे आहेत. जरी सर्वच फळे आरोग्यासाठी चांगली असली, तरी त्यांच्यातील नैसर्गिक आम्ल (Acid) आणि साखरेच्या प्रमाणामुळे सकाळी उपाशी पोटी ती खाणे टाळले पाहिजे. फळे नेहमी सकाळी हलका नाश्ता (उदा. पोहे, उपमा किंवा ओट्स) केल्यानंतर किंवा दोन जेवणाच्या मधल्या वेळात स्नॅक्स म्हणून खावीत. जर सकाळी केळी किंवा सफरचंद खायचेच असेल, तर ते बदाम, अक्रोड किंवा दह्यासोबत खा, जेणेकरून साखरेचा अचानक स्पाईक होणार नाही.**



**या फळांची यादी आणि त्यामागील कारणे खालीलप्रमाणे आहेत:** खाटी किंवा सायट्रस फळे संत्री, मोसंबी, लिंबू, द्राक्षे आणि किवी. या फळांमध्ये सायट्रिक ॲसिडचे प्रमाण खूप जास्त असते. रिकाम्या पोटी ती खाल्ल्याने पोटात जळजळ, गॅस आणि तीव्र ॲसिडिटी (Acid Reflux) होऊ शकते.

**१. केळी :** केळीमध्ये मॅग्नेशियम आणि पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते. सकाळी रिकाम्या पोटी केळी खाल्ल्याने रक्तातील मॅग्नेशियमचे प्रमाण अचानक वाढून शरीरातील कॅल्शियम-मॅग्नेशियमचे संतुलन बिघडू शकते. तसेच यातील साखरेमुळे रक्तातील साखर वेगाने वाढून नंतर लगेच थकवा जाणवू शकतो.

**२. अननस :** अननसामध्ये 'ब्रोमेलेन' (Bromelain) नावाचे एन्झाईम आणि भरपूर आम्ल असते. उपाशी पोटी अननस खाल्ल्याने पोटाच्या अस्तराला (Stomach Lining) सूज येऊ शकते आणि पोटात कळा येऊ शकतात.

**३. पेरू आणि सफरचंद :** पेरू आणि सफरचंदामध्ये कडक फायबर (Fibre) आणि पेक्टिनचे प्रमाण जास्त असते. रिकाम्या पोटी कडक फायबर पचवणे पोटासाठी कठीण होते, ज्यामुळे दिवसभर पोट फुगणे (Bloating) आणि पोटदुखीचा त्रास होऊ शकतो.

**४. कलिंगड :** कलिंगडात पाण्याचे प्रमाण खूप जास्त असते, जे सकाळी पोटातील पाचक रसांना (Stomach Acid) पातळ करते. तसेच, यातील उच्च फ्रुक्टोजमुळे (नैसर्गिक साखर) साखरेची पातळी एकाएकी वाढते.

# पाठीच्या त्रासावर उपाय

**वृत्तसंस्था :** सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत पाठीचा त्रास ही एक सामान्य पण गंभीर समस्या बनली आहे. दीर्घकाळ बसून काम करणे, चुकीच्या पद्धतीने बसणे किंवा उभे राहणे, व्यायामाचा अभाव, वाढते वजन आणि ताणतणाव यामुळे अनेकांना पाठदुखीचा सामना करावा लागतो. तरुणांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच वयोगटांमध्ये ही समस्या वाढताना दिसत आहे. तज्ज्ञांच्या मते, पाठीच्या त्रासाचे मुख्य कारण म्हणजे मणक्यांवर येणारा अतिरिक्त ताण. संगणकासमोर तासन्‌तास बसून काम करणारे कर्मचारी, वाहनचालक आणि शारीरिक श्रम करणाऱ्या व्यक्तींमध्ये पाठदुखीचे प्रमाण अधिक आढळते. चुकीच्या पोस्चरमुळे मणक्यांवर दबाव वाढतो आणि स्नायूंमध्ये ताण निर्माण होतो.पाठीच्या त्रासापासून बचावासाठी नियमित व्यायाम



अत्यंत महत्त्वाचा आहे. चालणे, योगासने, स्ट्रेचिंग आणि हलके व्यायाम केल्याने पाठीचे स्नायू मजबूत होतात. भुजंगासन, मकरासन आणि ताडासन यांसारखी योगासने पाठीच्या आरोग्यासाठी उपयुक्त मानली जातात. मात्र कोणताही व्यायाम तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार करणे आवश्यक आहे. कामाच्या ठिकाणी योग्य पद्धतीने बसणेही तितकेच महत्त्वाचे आहे. खुर्चीत बसताना पाठ सरळ ठेवावी, पाय जमिनीवर टेकलेले असावेत आणि संगणकाचा स्क्रीन डोळ्यांच्या समांतर असावा. सलग दीर्घकाळ बसण्याऐवजी दर तासाला काही मिनिटे चालणे किंवा शरीराची हालचाल करणे फायदेशीर ठरते. आहाराचाही पाठीच्या आरोग्यावर परिणाम होतो. कॅल्शियम, व्हिटॅमिन डी आणि प्रथिनेयुक्त आहार घेतल्यास हाडे आणि स्नायू मजबूत राहतात. दूध, दही, पनीर, हिरव्या पालेभाज्या आणि सुकामेवा यांचा आहारात समावेश करावा. तसेच शरीराचे वजन नियंत्रित ठेवणे आवश्यक आहे. जर पाठदुखी दीर्घकाळ टिकत असेल, पायात मुंग्या येत असतील किंवा हालचालींमध्ये अडथळा निर्माण होत असेल तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. स्वतःहून औषधे घेण्याऐवजी योग्य निदान करून उपचार करणे गरजेचे आहे. नियमित व्यायाम, योग्य बसण्याची सवय, संतुलित आहार आणि ताणतणाव नियंत्रणात ठेवणे या उपायांमुळे पाठीचा त्रास मोठ्या प्रमाणात कमी करता येतो. आरोग्यदायी जीवनशैली हीच निरोगी पाठीची गुरुकिल्ली आहे.


**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**निविदा सूचना क्र. १३ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४/७६ हे खालील कामासाठी **अनुभवी कंत्राटदार / ठेकेदार** यांचेकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून **दि. ०५/०६/२०२६ ते दि. १२/०६/२०२६ दु.१५.०० पर्यंत देण्यात येईल.** भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा **दि. १५/०६/२०२६ त्या दिवशी दुपारी १५.०५ वाजेपर्यंत** स्विकारतील आणि शक्यता त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नाव | अंदाजित किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | वर्ग | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | को-या निविदा नमुन्याची किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | External repair to Blood Bank Cama and Albless Hospital, Mumbai. | ७६०२७८/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| २ | Repairs in Blood Bank as FDA norms in Cama and Albless Hospital, Mumbai. | ७५८४४४/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ३ | Renovation in Blood Bank Cama and Albless Hospital, Mumbai. | ७५८४१२/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ४ | Renovation of Cancer Ward at Cama and Albless Hospital, Mumbai. | ७६१९३६/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ५ | Repairs in M.T. Roof Left Side of Cancer Ward at Cama and Albless Hospital, Mumbai. | ७६७९८१/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ६ | Repairs in M.T. Roof Right Side of Cancer Ward at Cama and Albless Hospital, Mumbai. | ७६८७५४/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ७ | Terrace Waterproofing ex. Plaster at Cama and Albless Hospital, Mumbai. | ७६२१५१/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ८ | Strengthening in Cama Bldg. at Cama and Albless Hospital, Mumbai. | ७६६२८५/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ९ | Structural Strengthening in Blood Bank Cama and Albless Hospital, Mumbai. | ७६८३२५/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

**जा.क्र.एघ(सा.बा)वि/निविदा/** ३७८७
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला,
२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६
दिनांक : २८/५/२०२६

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
फोर्ट, मुंबई.

**आरओसी - 2026-27/क्र- 5/C१०१०**

# गुटखा माफियांवर प्रशासनाचा सर्जिकल स्ट्राईक; अवघ्या पाच दिवसांत १९५ धाडी, १९२ जण गजाआड

**मुंबई (विशेष प्रतिनिधी) :** राज्यातील प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तत्सम तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) जोरदार मोहीम हाती घेतली असून अवघ्या पाच दिवसांत मोठी कारवाई करण्यात आली आहे. १ ते ५ जून २०२६ या कालावधीत राज्यभरात १९५ ठिकाणी धाडी टाकून तब्बल १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला. या कारवाईदरम्यान १९२ जणांना अटक करण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाने दिली. राज्यात प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक आणि विक्री रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. भारतीय न्याय संहितेतील कलम १२३, २२३,




२७४ आणि २७५ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील विविध तरतुदींनुसार गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान ३ जून रोजी धुळे जिल्ह्यातील सोनगीर येथे टाकण्यात आलेल्या धाडीत २३ लाख ५० हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याचा साठा जप्त करण्यात आला. त्यानंतर ४ जून रोजी समृद्धी महामार्गावरील सावंगी टोलनाक्यावर झालेल्या कारवाईत ६० लाख ५० हजार रुपयांचा प्रतिबंधित साठा आणि त्याची वाहतूक करणारे वाहन जप्त करण्यात आले. त्याच दिवशी नांदेड येथे करण्यात आलेल्या कारवाईत १७ लाख ५२ हजार ४५० रुपयांचा साठा आणि वाहन ताब्यात घेण्यात आले. तर पिंपरी-चिंचवडमधील मोशी परिसरात ६ लाख १९ हजार ९८२ रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ जून रोजी धाराशिव जिल्ह्यातील परांडा येथे संशयाच्या आधारे करण्यात आलेल्या धाडीत १ कोटी २ लाख ६७ हजार २६३ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली आहे. विभागनिहाय आकडेवारीनुसार, बृहन्मुंबई क्षेत्रात ३० धाडी टाकून ३ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आणि ३० जणांना अटक करण्यात आली. तर पुणे विभागात ७९ धाडीत ८ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून ७८ जणांना अटक करण्यात आली असल्याची माहिती सहआयुक्त (अन्न) महेश चौधरी यांनी दिली. राज्यातील प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याच्या अवैध व्यवसायावर आळा घालण्यासाठी अशी कारवाई यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# कल्याण–मोहने परिसरात मध्यरात्री गोळीबार; तीन आरोपी अटकेत

**कल्याण (विशेष प्रतिनिधी) :** मोहने-अटाळी परिसरातील पाटील नगर येथे शुक्रवारी मध्यरात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास गोळीबाराची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत तीन आरोपींना अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिषेक उर्फ अभी पवार आणि त्याचे काही साथीदार पाटील नगर परिसरातून जात असताना मोनू फुलोरे यांच्यात जुन्या वादाच्या कारणावरून वाद झाला. त्यानंतर मोनू फुलोरे यांच्या दिशेने दोन राऊंड फायरिंग करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. गोळीबारानंतर घाबरलेल्या मोनू फुलोरे यांनी तात्काळ खडकपाडा पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. फिर्यादी फुलोरे यांच्या म्हणण्यानुसार, अभि पवार यांनी



आपल्यावर गुन्हा दाखल होऊ नये यासाठी स्वतःवरच गोळी झाडून घेतल्याचा धक्कादायक दावा करण्यात आला आहे. या दाव्याची पोलिसांकडून पडताळणी करण्यात येत आहे. प्राथमिक तपासात व्हॉट्सअॅप स्टेटसवरून सुरू झालेला वाद आणि पूर्वीचे मतभेद हे या घटनेमागील प्रमुख कारण असल्याचे समोर आले आहे. परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करून तीन आरोपींना अटक केली आहे. घटनेचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमरनाथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आंधळे करीत असून गोळीबारामागील नेमके कारण आणि इतर संबंधित बाबींचा सखोल तपास करण्यात येत आहे. या घटनेमुळे मोहने-अटाळी परिसरात पुन्हा एकदा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून नागरिकांनी अशा प्रकारच्या गुन्हेगारी प्रवृत्तींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# गोरखपूर एक्सप्रेसमधून पळणारे खुनी कसाऱ्यात गजाआड

**ठाणे (विशेष प्रतिनिधी) :** वर्तकनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोखरण रोड क्रमांक २ येथील हनुमान मंदिराजवळ ५ जून रोजी घडलेल्या तरुणाच्या हत्येच्या प्रकरणाचा अवघ्या २४ तासांत छडा लावत वागळे क्राईम ब्रँच युनिट-५ ने धडाकेबाज कामगिरी केली आहे. या प्रकरणातील दोन मुख्य आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्यासोबत १३ संशयितांना देखील ताब्यात घेण्यात आले आहे. दीपक भूषण जैस्वार (वय २३, रा. गांधीनगर, ठाणे) याला बेदम मारहाण करण्यात आल्यानंतर त्याचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर वर्तकनगर पोलिसांसोबतच गुन्हे शाखेच्या वागळे युनिट-५ ने समांतर तपास सुरू केला. गुप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी अजय देवकीलाल गिरी (वय २८) आणि शिवा संजय गोस्वामी (वय २५), दोघेही उत्तर प्रदेशातील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले. तपासादरम्यान आरोपी पनवेल रेल्वे स्थानकावरून गोरखपूर एक्सप्रेसने उत्तर प्रदेशकडे पसार होत असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सलील भोसले यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तात्काळ रवाना करण्यात आले. पोलिसांनी अत्यंत शिताफीने रेल्वेमधून आरोपींचा गुप्त पाठलाग केला



आणि कसारा रेल्वे स्थानकावर सापळा रचत दोन्ही मुख्य आरोपींसह १३ संशयितांना सायंकाळी ताब्यात घेतले. अवघ्या २४ तासांत आरोपींच्या मुसक्या आवळल्याने पोलिसांच्या तपास कौशल्याची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. या कारवाईत पोलीस सहआयुक्त (गुन्हे) डॉ. पंजाबराव उगले, पोलीस उपआयुक्त पराग मणेरे आणि अमरसिंह जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर बागडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सलील भोसले, महिला पोलीस निरीक्षक पल्लवी ढगेपाटील, उपनिरीक्षक सुनिल अहिरे, उपनिरीक्षक राजेंद्र चौधरी, पोलीस नाईक तेजस ठाणेकर आणि पोलीस कॉन्स्टेबल मिनीनाथ शिकारे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# परराज्यातील अवैध मद्य वाहतुकीवर धडक कारवाई; १.९ कोटींचा मुद्देमाल जप्त

**ठाणे (विशेष प्रतिनिधी) :** पुणे शहरात नुकतीच घडलेली विषारी दारू दुर्घटना लक्षात घेता, राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध आणि बनावट मद्याच्या विरोधात धडक कारवाई सुरु केली आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून ठाणे जिल्ह्यात एका मोठ्या कारवाईत तब्बल १ कोटी ८९ लाख ६६ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख आणि सह-आयुक्त (अं. व द.) प्रसाद सुर्वे यांच्या मार्गदर्शनानुसार, कोकण विभागाचे उपआयुक्त प्रदीप पवार यांनी संपूर्ण परिसरात परराज्यातील व बेकायदेशीर मद्य वाहतुकीविरोधात विशेष मोहीम उघडली आहे. पनवेल-मुंब्रा हायवेवरील दहिसर मोरी परिसरातून परराज्यातील अवैध मद्याची मोठी खेप नेली जाणार असल्याची खात्रीलायक माहिती राज्य उत्पादन



शुल्क विभागाचे निरीक्षक दिगंबर शेवाळे यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने तातडीने हालचाली करत दहीसर मोरी येथील ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसमोर सापळा रचला. आणि काही वेळातच संशयित चॉकलेटी आणि पांढऱ्या रंगाचा सहाचाकी आयशर ट्रक (क्र. जीजे-२३-एवाय-१७१८) अडवून चालककाडे चौकशी केली असता, त्याने ट्रकमध्ये वाहनांचे सुटे भाग भरलेले असल्याचे सांगून अधिकाऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पक्की माहिती असल्याने पथकाने ट्रकची ताडपत्री काढून कसून तपासणी केली. तेव्हा अधिकाऱ्यांना खाकी रंगाचे शेकडो बॉक्स आढळून आले. हे बॉक्स उघडले असता त्यात गोवा राज्यात निर्मिती झालेल्या 'रॉयल ब्ल्यू माल्ट व्हिस्की' या ब्रँडच्या १८० मिली क्षमतेच्या बाटल्यांचा साठा सापडला. विशेष म्हणजे या बाटल्यांवर कोणत्याही प्रकारचा बॅच नंबर अथवा कमाल विक्री किंमत छापलेली नव्हती. महाराष्ट्र राज्यात या मद्याच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी आहे. पोलिसांनी ट्रकमधून एकूण १५३० बॉक्स जप्त केले, ज्यामध्ये ७३,४४० दारूच्या बाटल्या होत्या. या प्रकरणी ट्रक चालक प्रविण किशनलाल कुमार याला अटक केली. या कारवाईत आयशर ट्रक, ७३ हजारहून अधिक दारूच्या बाटल्या आणि एक मोबाईल फोन असा एकूण १,८९,६६,८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. प्रवीण कुमार विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरु करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या या यशस्वी कामगिरीत निरीक्षक दिगंबर शेवाळे यांच्यासह दुय्यम निरीक्षक रिंकेश दांगट, दुय्यम निरीक्षक एच. बी. यादव, सहाय्यक दुय्यम निरीक्षक महावीर कोळेकर आणि जवान कुणाल तडवी, अमित सानप, हनुमंत गाढवे व सागर चौधरी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. आपल्या परिसरात कुठेही बनावट दारू, परराज्यातील बेकायदेशीर मद्य, अवैध मद्य निर्मिती किंवा विक्री होत असल्यास, अथवा मिथेनॉल आणि क्लोरेल हायड्रेट सारख्या मानवी जीवाला घातक असणाऱ्या रसायनांची निर्मिती, भेसळ किंवा वाहतूक होत असल्यास नागरिकांनी तातडीने प्रशासनाला टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९, व्हॉट्सअॅप क्रमांक ८४२२००११३३ वर माहिती द्यावी, असे आवाहन उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने करण्यात आले आहे; तसेच माहिती देणाऱ्या नागरिकांचे नाव आणि ओळख संपूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# पुण्यात 'प्रोजेक्ट एक्स' रेव्ह पार्टीवर छापा




**पुणे (विशेष प्रतिनिधी) :** पुण्यापासून सुमारे ३० किमी अंतरावर असलेल्या तुळापूर भागातील एका आलिशान बंगल्यात 'प्रोजेक्ट एक्स'च्या नावाखाली रात्री ११.३० ची निर्धारित वेळ उलटून गेलेली एक हाय-प्रोफाईल पार्टी, पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने रविवारी पहाटे टाकलेल्या छाप्यात उघडकीस आणली. या कारवाईत रात्री उशिरा होणारा एक मेळावा उघडकीस आला, ज्यात मद्यधुंद लोक, कानठळ्या बसवणारे संगीत, प्रतिबंधित हुक्का पॉट्स व फ्लेवर्स, गांजाचे सेवन आणि दारू परवान्याच्या अटींचे कथित उल्लंघन यांचा समावेश होता. पोलिसांनी एफआयआरमध्ये या कार्यक्रमाला 'रेव्ह' पार्टी म्हटले आहे. हा बंगला पिंपरी चिंचवड येथील एका व्यावसायिकाच्या मालकीचा आहे. रविवारी पहाटे २.३० वाजता जेव्हा त्यावर छापा टाकण्यात आला, तेव्हा अधिकाऱ्यांना तिथे १०७ पुरुष आणि ४९ महिला आढळल्या, ज्यात पुण्यातील काही पब मालकांचाही समावेश होता. भीमा नदीच्या काठावर असलेला हा बंगला शेतांनी वेढलेला असून, तो पार्ट्या आणि कार्यक्रमांसाठी भाड्याने दिला जातो, असे पोलिसांनी सांगितले. पार्टीमध्ये सहभागी होण्यासाठी मुंबई, जयपूर, गुरुग्राम, दिल्ली आणि इतर शहरांमधून अनेक जण आले होते. या कार्यक्रमाची जाहिरात सोशल मीडिया माध्यमांद्वारे करण्यात आली होती. अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे) तेजस्वी सातपुते म्हणाले, "आम्ही बेकायदेशीर पार्टीच्या सात आयोजकांसह ७८ जणांना ताब्यात घेतले असून, ८५ लाख रुपयांची दारू, हुक्का पॉट्स आणि इतर साहित्य जप्त केले आहे." पोलिसांनी सांगितले की, पार्टीला आलेले लोक पुणे रेल्वे स्टेशनजवळील एका पबमध्ये नियमितपणे येतात. आयोजकांना शहराबाहेर पूलसाइड रेव्ह पार्टी आयोजित करायची होती आणि तिथे स्विमिंग पूल असल्यामुळे त्यांनी ही जागा निवडली. पोलिसांनी असा संशय व्यक्त केला आहे की, त्यांनी कार्यक्रमानंतर एका आफ्टर-पार्टीचेही नियोजन केले होते. "२१ वर्षांखालील व्यक्तींना दारू देण्यास परवानगी नाही आणि आम्हाला संशय आहे की उपस्थितांपैकी काही जण २१ वर्षांखालील होते. आम्ही त्यांच्या वयाची पडताळणी करत आहोत. आम्हाला अल्प प्रमाणात अमली पदार्थही सापडले आहेत, जे गांजा असल्याचा संशय आहे," असे सातपुते यांनी पुढे सांगितले. पोलीस उपआयुक्त (गुन्हे) गौहर हसन यांनी सांगितले की, त्यांनी ७८ जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. "आम्ही त्यांना अटक करणार नाही, परंतु तपासात सहकार्य करण्याचे निर्देश देणारी नोटीस बजावू," असे ते म्हणाले. राज्य उत्पादन शुल्क विभाग, पुणेचे अधीक्षक अतुल कानाडे म्हणाले, "आम्ही शनिवारी रात्री ११.३० वाजेपर्यंतच कार्यक्रमाच्या ठिकाणी दारू विक्रीस परवानगी दिली होती. मात्र, त्यांनी दिलेल्या वेळेचे उल्लंघन केले. पार्टीसाठी परवानगी मिळवलेल्या व्यक्तीवर आम्ही कारवाई सुरू करू."

## कोणाकोणाला ताब्यात घेण्यात आले?

- पबचे मालक, व्यवस्थापक आणि आयोजक यांच्याव्यतिरिक्त, पोलिसांनी १४ बाउन्सर, मोठ्या आवाजात संगीत वाजवल्याच्या आरोपाखाली पाच डीजे, विजेची रोषणाई हाताळणारे दोन जण, पार्टीमध्ये दारू आणि अमली पदार्थांचे सेवन केल्याचा आरोप असलेले २२ जण, तसेच बारटेंडर, शेफ, हाऊसकीपिंग कर्मचारी आणि इतर सहाय्यक कर्मचाऱ्यांवरही गुन्हा दाखल केला.
- लोणीकंद पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) च्या कलम २२३ (लोकसेवकाने रीतसर जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन), २७० (सार्वजनिक उपद्रव) आणि ३(५) (सामूहिक उद्देश) तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायदा, महाराष्ट्र पोलीस कायदा, नारकोटिक ड्रग्स अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस (एनडीपीएस) कायदा आणि कोटपा कायद्याच्या संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
- पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखेला तुळापूर येथील एका फार्महाऊसवर पार्टी सुरू असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे, १५ अधिकारी आणि ६५ पोलिसांच्या पथकाने पहाटे २.३० च्या सुमारास त्या ठिकाणी छापा टाकला.
- "आमच्या तपासात असे उघड झाले आहे की, कार्यक्रमासाठी मिळालेला दारूचा परवाना ६ जून रोजी रात्री ११.३० वाजेपर्यंतच वैध होता. मात्र, ही पार्टी रविवारी पहाटेपर्यंत सुरू राहिली, जे परवान्याच्या अटींचे स्पष्ट उल्लंघन दर्शवते. दारूचा पुरवठा कोणी केला आणि अधिकृत वेळेनंतरही कार्यक्रम कसा सुरू राहिला, याचाही आम्ही तपास करत आहोत," असे अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे) तेजस्वी सातपुते यांनी सांगितले.

# वसईत घरफोडी; दागिने व रोख रक्कमसह एक लाखांचा ऐवज लंपास

**वसई (विशेष प्रतिनिधी) :** वसई पश्चिम येथील निर्मळ परिसरात अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून दागिने आणि रोख रक्कम असा सुमारे १ लाख १ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी वसई पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून तपास सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ जून २०२६ रोजी रात्री १० वाजल्यापासून ५ जून रोजी सकाळी ६ वाजेपर्यंतच्या कालावधीत ही चोरी झाली. फिर्यादी यांचे निर्मळ येथील श्री सद्गुरुकृपा इमारतीतील घर बंद असल्याचा फायदा घेत चोरट्यांनी मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. यानंतर चोरट्यांनी घरातील बेडरूममधील कपाट फोडून त्यामध्ये ठेवलेले मौल्यवान दागिने आणि रोख रक्कम लंपास केली. चोरीला गेलेल्या ऐवजात चांदीची लक्ष्मीची मूर्ती, चांदीची पैजण, जोडव्या, चांदीच्या अंगठ्या, सोन्याची कर्णफुले, सोन्याच्या रिंगा तसेच २० हजार रुपयांची रोख रक्कम यांचा समावेश आहे. या सर्व वस्तूंची एकूण किंमत सुमारे १ लाख १ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. सकाळी घरमालकांना चोरीची घटना लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच वसई पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. परिसरातील संशयित हालचालींची माहिती घेण्याबरोबरच जवळच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. अलीकडच्या काळात वसई-विरार परिसरात घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. बंद घरे हेरून चोरी करणाऱ्या टोळ्यांचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे.


**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**निविदा सूचना क्र.९१ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४/७६ हे खालील कामासाठी **अनुभवी कंत्राटदार / ठेकेदार** यांचेकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून **दि.०५/०६/२०२६ ते दि.१२/०६/२०२६ दु.१५.०० पर्यंत देण्यात येईल.** भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा **दि.१५/०६/२०२६ त्या दिवशी दुपारी १५.०५ वाजेपर्यंत** स्विकारतील आणि शक्यता त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नाव | अंदाजित किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | वर्ग | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | को-या निविदा नमुन्याची किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Repairs and renovation to Flat No.22 on 5th floor in Trimurti Doctor Quarters Building at Sir J.J. Group of Hospitals, Mumbai. | ८१५१०७/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| २ | Repairs and renovation to Flat No.24 on 5th floor in Swastik Doctor Quarters Building at Sir J.J. Group of Hospitals, Mumbai. | ८१४१७३/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ३ | Providing and fixing metal false ceiling to ward No.24 Varanda 4th floor area at Sir J.J. Group of Hospital, Mumbai. | ८३०९५०/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ४ | Replace to new water Storage systex tanks and pipe lines fittings above Terrace on Ellappa Balaram Building at Sir J.J. Group of Hospital Compound, Mumbai. | ८३०६३२/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ५ | Replacing water supply tanks and repairs to pipe lines above fourth floor terrace at David Sassoon Hospital Building at Sir J.J. Hospital Compound, Mumbai. | ८३०६४१/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ६ | Providing and fabricating steel gate and collapsible gate in Main Building, Vrundavan, Samruddhi, Matruchaya, Jay ambe, Sharadha and Saikrupa Building at St. Georges Hospita, Mumbai. | ८३३१६९/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ७ | Repairs and renovation to plaster, painting to class 3 Quarter Building No.8(A) (Room No.10, 30) at Sir J.J. Group of Hospital, Mumbai. | ८२५८७१/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ८ | Repairs and renovation to plaster, painting to class 3 Quarter Building No.8(B) (Room No.63, 64) at Sir J.J. Group of Hospital, Mumbai. | ८२४७७४/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र.एघ(सा.बा)वि/निविदा/ 3812
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला,
२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६
दिनांक : 20-5-2026

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग,
फोर्ट, मुंबई.

आरओसी - 2025-26/क्र- 5/C१०११

# नालासोपाऱ्यातील बौद्धस्तूपाचा इतिहास आता एका क्लिकवर; क्युआर कोडने बदलणार पर्यटनाचा चेहरा!

**■ विरार (सुचिता देशमुख) :** नालासोपाऱ्यातील पुरातन बौद्धस्तूप व येथील पर्यटनाला चालना देण्यासाठी पुरातत्व विभागाकडून उपाययोजना आखण्यास सुरुवात केली आहे. नुकताच या बौद्धस्तूप परीसरात प्रकाशयोजना कार्यान्वित केली आहे. याशिवाय या स्तूपाची माहिती येणाऱ्या पर्यटकांना मिळावी यासाठी क्यू आर कोड स्कॅनर ही बसविण्यात आले आहे. नालासोपारा पश्चिमेच्या सोपारा येथे अडीच हजार वर्षांपूर्वीचा बौध्द स्तूप आहे. परंतु या स्तूपाची दुरवस्था झाली होती. याशिवाय येथे भेट देणाऱ्या पर्यटकांना सोयीसुविधा मिळत नव्हत्या. या बौद्धस्तूपाचे संवर्धन व्हावे व येणाऱ्या पर्यटकांना सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्यमहोत्सवी समिती, माजी महापौर रुपेश जाधव व त्यांच्या शिष्टमंडळाने यासाठी पाठपुरावा केंद्रीय पुरातत्व



खात्याच्या संचालिका तसेच पुरातत्व खात्याच्या अधीक्षकांकडे याबाबत पाठपुरावा सुरू केला होता. त्यानुसार बौद्धस्तूपाच्या भागात विविध प्रकारची विकास कामे हाती घेऊन पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न पुरातत्व विभागाकडून केला जात आहे. नुकताच पुरातत्व विभागाने स्तूपाच्या सभोवताली प्रकाश योजना बसवून स्तूप रात्रीच्या सुमारास ही आकर्षक कसे दिसेल यावर भर दिला आहे. तर दुसरीकडे या स्तूपाला अनेक पर्यटक भेट देत असतात. मात्र या स्तूपाची माहिती पर्यटकांना व्हावी यासाठी स्तूपाच्या संदर्भातील ध्वनीचित्रफीत तयार केली आहे. क्यू आर कोड स्कॅन करताच पर्यटकांना ती ध्वनीफीत ऐकून या स्तूपाची माहिती घेता येणार आहे. aबौद्ध स्तूपाच्या जवळून मुख्य रस्ता जातो. मात्र त्या स्तूपाला कोणत्याही प्रकारची सुरक्षा भिंत नसल्याने त्याठिकाणी गैरप्रकार घडण्याची भीती व्यक्त केली जात होती. या स्तूपाच्या सुरक्षेच्या दृष्टीने आता पुरातत्व विभागाने दुरूस्तीचे काम ही हाती घेतले आहे अशी माहिती पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. नालासोपाऱ्यातील बौद्ध स्तूपाबद्दल माहिती देणारी चित्रफीत ही पुरातत्व विभागाने तयार केलेली आहे. या ध्वनिफितीत नालासोपारा येथील बौद्धतीपातील गौतम बुद्धांचा वावर, येथे सापडलेल्या त्यांच्या वस्तू, या वस्तूंशी निगडित इतिहास, तसेच सातवाहन राजा पासूनचा आणि त्याच्या पूर्वीपासूनच्या इतिहासाचा उल्लेख केलेला आहे. तसेच नालासोपाऱ्यातील स्तूप हा सांचीतील स्तूपाची प्रतिकृती असल्याचे म्हटले जाते. पण, ते उलट करून सांचीचा स्तूप हा नालासोपाऱ्यातील बौद्धस्तूपाची प्रतिकृती कशाप्रकारे आहे. याची माहितीसुद्धा या ध्वनिफितीद्वारे दिली जाणार असल्याचे स्थानिकांनी सांगितले आहे. तर लोकांना धम्माबद्दल किंवा या स्तुपाबद्दलची माहिती मिळावी, तरुण पिढीपर्यंत हा इतिहास सोप्या पद्धतीने पोहोचवता यावा, हा यामागचा मूळ उद्देश आहे.

# कॉक्रोच जनता पार्टीचा सरकारवर हल्लाबोल

**'शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मिळेपर्यंत आंदोलन सुरूच!'**




**■ छत्रपती संभाजीनगर (महेश पानसरे) :** नीट (NEET) परीक्षा आणि शिक्षण व्यवस्थेतील कथित अनियमिततेच्या मुद्द्यावर कॉक्रोच जनता पार्टीचे अभिजित दिपके यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी देशातील शिक्षण व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचा आरोप केला. नीट परीक्षेतील घोळामुळे एक कोटीहून अधिक विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले असून अनेक विद्यार्थ्यांनी नैराश्यातून टोकाचे पाऊल उचलल्याचा दावा त्यांनी केला. देशाचे शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा देईपर्यंत आंदोलन थांबवले जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. येत्या सहा दिवसांत शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. दिपके यांनी पंतप्रधानांवरही निशाणा साधत, आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रश्नांमध्ये हस्तक्षेप करणारे नेतृत्व देशातील पेपरफुटीच्या घटनांवर नियंत्रण का मिळवू शकत नाही, असा सवाल उपस्थित केला. या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक असून जबाबदारी स्वीकारल्याशिवाय व्यवस्था सुधारणार नाही, असे त्यांनी नमूद केले. अमेरिकेतून भारतात परतल्यानंतर थेट जंतर-मंतर येथे गेलो असता मोठ्या संख्येने तरुण आंदोलनात सहभागी झाल्याचे त्यांनी सांगितले. तरुण आता आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरण्यास तयार असून सरकारला घाबरणार नसल्याचेही त्यांनी म्हटले. आंदोलनकर्त्यांवर आणि प्रश्न विचारणाऱ्यांवर होत असलेल्या टीकेचाही दिपके यांनी समाचार घेतला. सीबीएसईच्या एका विद्यार्थ्याने गुणपत्रिकेतील कथित त्रुटी समोर आणल्यानंतर त्याच्यावर टीका करण्यात आल्याचा उल्लेख करत, प्रश्न विचारणाऱ्यांना किंवा बेरोजगार तरुणांना देशविरोधी ठरवण्याची प्रवृत्ती थांबली पाहिजे, असे ते म्हणाले. हे आंदोलन कोणत्याही एका राजकीय पक्षासाठी नसून विद्यार्थ्यांचे, बेरोजगारांचे आणि तरुणांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांसाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देशात दरवर्षी लाखो विद्यार्थी पदवीधर होत असले तरी त्यापैकी मोठ्या संख्येला रोजगार मिळत नसल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. निवडणुकांमध्ये मतदान करण्याइतकेच निवडून दिलेल्या प्रतिनिधींना प्रश्न विचारणे हेही लोकशाहीचे महत्त्वाचे अंग असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय, राज्यातील राजकीय वातावरणावर भाष्य करताना त्यांनी संविधान, सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्यांबाबतही आपली भूमिका मांडली. महाराष्ट्र हा पुरोगामी विचारांचा राज्य असल्याचे सांगत संविधानावर विश्वास ठेवणाऱ्यांना लक्ष्य करणे योग्य नसल्याची टीका त्यांनी केली. तरुणांच्या प्रश्नांवर आवाज उठवणे सुरूच राहील आणि न्याय मिळेपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# अवघ्या १५ व्या वर्षी सचिनचा विक्रम मोडत वैभव सूर्यवंशीची टीम इंडियात एन्ट्री!

**■ वृत्तसंस्था :** आगामी आयर्लंड आणि इंग्लंड मालिकांसह आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय टी-२० संघाची घोषणा करण्यात आली असून, निवडकर्त्यांनी युवा खेळाडू वैभव सूर्यवंशी याला संघात स्थान देत मोठा विश्वास दाखवला आहे. श्रेयस अय्यर यांच्या नेतृत्वाखाली नव्या पर्वाची सुरुवात करणाऱ्या भारतीय संघात अवघ्या १५ वर्षीय वैभवची निवड झाली आहे. यामुळे भारतीय क्रिकेटमध्ये एक नवा विक्रम नोंदवला गेला असून सर्वात कमी वयात भारतीय वरिष्ठ संघात निवड होणारा खेळाडू म्हणून त्याने आपले नाव इतिहासात कोरले आहे. याआधी हा विक्रम क्रिकेटचा देव मानल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकर यांच्या नावावर होता. १९८९ मध्ये पाकिस्तान दौऱ्यासाठी सचिनची भारतीय संघात निवड झाली होती, त्यावेळी त्यांचे वय १६ वर्षे १८१




दिवस होते. मात्र वैभवने केवळ १५ व्या वर्षी भारतीय संघात स्थान मिळवत हा विक्रम मागे टाकला आहे. वैभव सूर्यवंशीने यंदाच्या आयपीएल हंगामात आपल्या आक्रमक फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अनुभवी आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गोलंदाजांविरुद्ध दमदार कामगिरी करत त्याने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. स्पर्धेत त्याने तब्बल ७७६ धावा करत ऑरेंज कॅप पटकावले आहे. संपूर्ण हंगामात अनेक विक्रम आपल्या नावावर करत त्याने भारतीय संघाच्या दारावर जोरदार टकटक केली होती. त्याच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरीची दखल घेत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (भारतीय क्रिकेट नियामक मंडळ) त्याला राष्ट्रीय संघात संधी दिली आहे. त्यामुळे आता आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्याच्याकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात असून भारतीय क्रिकेटला आणखी एक युवा तारा मिळाल्याची चर्चा क्रिकेट वर्तुळात सुरू आहे.

# पीएमपीचा मोठा निर्णय; प्रत्येक बसमध्ये 'सीसीटीव्ही' कॅमेरे आणि ७,५०० बस थांब्यांचे रूप पालटणार!

**■ पुणे (अकिल शेख) :** नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण, अपघातांचे नेमके कारण शोधण्यासाठी पुणे महानगर परिवहन मंडळाच्या (पीएमपी) सर्व बसमध्ये 'सीसीटीव्ही कॅमेरे' आणि 'डॅश कॅम' बसवणार असल्याची माहिती 'पीएमपी'चे व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी दिली. सजग नागरिक मंचाच्या वतीने आयोजित मासिक चर्चासत्रात ते बोलत होते. 'पीएमपी'च्या सह-व्यवस्थापकीय संचालक ॲलिस पोरे, मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर, जुगल राठी, संजय शितोळे आदी या वेळी उपस्थित होते. आव्हाड म्हणाले, ''पीएमपीएमएल'च्या गाड्यांचे वर्षाला सुमारे १० प्राणांतिक अपघात होतात. पोलीस अनेकदा मोठ्या वाहनचालकाला जबाबदार धरून गुन्हा नोंदवतात. मात्र, अनेकदा अपघातांमध्ये त्या वाहनचालकाचा दोष नसतो. 'डॅश कॅम'मुळे अपघाताचे नेमके कारण समोर येईल. तसेच, सीसीटीव्हीमुळे सिग्नल तोडणे, झेब्रा



क्रॉसिंगवर बस थांबवणे आदी बेशिस्त वर्तनावरही लक्ष ठेवता येईल.' 'दिवसाला दोन हजारांहून अधिक प्रवासी असलेल्या मार्गांवर बसची संख्या वाढवण्यात येणार आहे. मागणीनुसार बस देण्याचा विचार आहे,'असेही त्यांनी सांगितले. आव्हाड म्हणाले,'रेल्वे स्थानक, विमानतळ, एसटी आणि मेट्रोतून उतरणाऱ्या प्रवाशांना लवकरात लवकर इच्छित स्थळापर्यंत जाण्यासाठी बसची संख्या आणि वारंवारिता वाढवण्यात येणार आहे. तसेच, प्रवाशांना बस आणि मेट्रोसाठी वेगळे तिकीट काढावे लागू नये म्हणून, 'वन नेशन वन कार्ड' धर्तीवर प्रयत्न करण्यात येत आहेत.' 'पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात पीएमपीचे ९ हजार थांबे आहेत. त्यातील केवळ दीड हजार थांब्यांवर छप्पर आहे. उर्वरित साडेसात हजार थांबे 'एक पोल आणि पाटी' अशा अवस्थेत आहेत. आता सार्वजनिक-खासगी भागीदारीतून या थांब्यांचा कायपालट करणार असून, हायटेक थांब्याच्या बदल्यात त्या कंपनीला १५ वर्षांसाठी जाहिरातीचे अधिकार देण्यात येतील,' अशी माहिती महेश आव्हाड यांनी दिली. 'हे थांबे सौर ऊर्जेवर चालणारे असतील. प्रत्येक थांब्यावर दोन सीसीटीव्ही कॅमेरे, ध्वनिक्षेपक यंत्रणा आणि बसचे वेळापत्रक दाखवणारे डिजिटल माहितीफलक असतील. कचऱ्याचे डबे आणि शक्य झाल्यास पिण्याच्या पाण्याची सोयही बस थांब्यांवर उपलब्ध करून देण्याचा विचार आहे,' असेही त्यांनी नमूद केले.

### पुणेकरांच्या मागण्या

- मार्गांवरच बस बंद पडण्याचे प्रमाण शून्य
- बीआरटी मार्गिका सुरू करावी
- चढ-उतार करण्यासाठी सहज-सुलभ-सुरक्षित व्यवस्था
- थांब्यांवर बसचे वेळापत्रक दाखवणारे डिजिटल बोर्ड, उद्घोषणा
- विद्यार्थी, कामगारांना विशेष सवलत
- शाळा-महाविद्यालये आणि कंपन्यांजवळ थांबे
- पासची व्यवस्था अधिक सुकर, दैनिक पास ५० रुपये आणि साप्ताहिक पासचीही सोय
- प्रत्येक तक्रारीचे निराकरण आणि त्याची पडताळणी – प्रवाशांच्या गरजेप्रमाणे, गर्दीप्रमाणे बदलणारी सेवा, गर्दीच्या मार्गांवर विनाथांबा किंवा कमी थांब्याच्या बस

## संक्षिप्त

### महागाईचा फटका: राज्यभरात सलून सेवांच्या दरात २०% वाढ!

**■ मुंबई :** वाढती महागाई, इंधन दरवाढ आणि महागलेली सौंदर्यप्रसाधने (शॅम्पू, जेल, वॅक्स) यामुळे महाराष्ट्र नाभिक महामंडळाने राज्यभरात सलून सेवांच्या दरात २० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. दुकान भाडे, वीजबिल आणि व्यवसाय खर्च वाढल्याने हा निर्णय अपरिहार्य असल्याचे महामंडळाने स्पष्ट केले.या निर्णयामुळे आता ग्राहकांना कटिंग, दाढी, फेशियल आणि मेकअपसाठी अधिक पैसे मोजावे लागतील. नवीन दरांनुसार प्रीमियम सलूनमध्ये दाढीसाठी २०० ते ५०० रुपये, कटिंगसाठी ५०० ते १००० रुपये, हेअर कलरसाठी ७०० ते १००० रुपये आणि फेशियलसाठी २००० ते ३००० रुपये आकारले जाणार आहेत. एसी सलूनमध्ये दाढीचे दर १०० ते २०० रुपये, कटिंगचे १५० ते ३५० रुपये, तर हेअर कलरचे ३०० ते ५०० रुपये असतील. ग्रामीण भागातील सलूनमध्ये दाढीसाठी ५० ते ७० रुपये, कटिंगसाठी ८० ते १०० रुपये आणि हेअर कलरसाठी ८० ते १०० रुपये शुल्क आकारले जाईल. याशिवाय हेअर ट्रिटमेंट, ब्रायडल मेकअप आणि ग्रुम मेकअपच्या दरांतही वाढ करण्यात आली आहे.या दरवाढीमुळे सलून व्यावसायिकांना दिलासा मिळणार असला, तरी सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशावर मात्र अतिरिक्त भार पडणार आहे.

### स्कूलबस प्रवास महागला; राज्यभर बस शुल्कात १५ टक्के वाढ!

**■ पुणे :** स्कूलबस ओनर्स असोसिएशनने (SBOA) संपूर्ण महाराष्ट्रात शालेय बस वाहतूक शुल्कात १५ टक्के वाढ जाहीर केली आहे. ही दरवाढ जून २०२६ पासून लागू झाली आहे. डिझेल व इंधनाचे वाढते दर, चालक-कर्मचाऱ्यांच्या वेतनातील वाढ, विम्याचा हप्ता, टोल आणि वाहनांच्या देखभाल-दुरुस्तीचा वाढता खर्च यांमुळे हा निर्णय घेणे भाग पडल्याचे संघटनेचे अध्यक्ष अनिल गर्ग यांनी स्पष्ट केले. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच शाळांची फी, पुस्तके आणि गणवेश महागले असताना, आता बस शुल्क वाढल्याने पालकांच्या मासिक खर्चात मोठी भर पडणार आहे. संघटनेने करांमध्ये सवलत देण्याची किंवा ऑनलाईन शिक्षणाचा विचार करण्याची मागणी शासनाकडे केली होती, परंतु त्यावर कोणताही निर्णय न झाल्याने अखेर ही शुल्कवाढ लागू करण्यात आली.

# पुणे ग्रामीण पोलिस दलात मोठी खांदेपालट; ३० निरीक्षकांच्या बदल्या जाहीर

**■ पुणे (अभिजीत येरल्लू) :** अलीकडेच पुणे शहर पोलीस दलात काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यानंतर आता पुणे ग्रामीण पोलीस दलातही मोठ्या प्रमाणावर बदल करण्यात आल्याने पोलीस प्रशासनात नव्या घडामोडींना वेग आला आहे. पुणे ग्रामीण पोलीस दलात मोठ्या प्रमाणावर अंतर्गत बदल्या करण्यात आल्या असून, एकाच आदेशात तब्बल ३० पोलीस निरीक्षक (PI) आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) यांची नव्या ठिकाणी नियुक्ती करण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्यासोबतच प्रशासकीय कामकाजात गतिमानता आणण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी काढलेल्या आदेशानुसार विविध पोलीस ठाण्यांमधील अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. या बदल्यांमुळे




अनेक महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांमध्ये नवीन नेतृत्व मिळणार असून, स्थानिक पातळीवरील पोलीस यंत्रणा अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात येत आहे. या बदल्यांमध्ये सासवड, बारामती तालुका, लोणावळा शहर, रांजणगाव एमआयडीसी, शिरूर, हवेली, यवत, राजगड, जेजुरी, इंदापूर, दौंड, शिक्रापूर आणि भिगवण या महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. ग्रामीण भागातील वाढत्या जबाबदाऱ्या आणि विविध प्रलंबित प्रशासकीय गरजा लक्षात घेऊन हे फेरबदल करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या बदल्यांमुळे विविध पोलीस ठाण्यांमधील कामकाजाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. गुन्हेगारी नियंत्रण, कायदा व सुव्यवस्था राखणे आणि नागरिकांना अधिक प्रभावी सेवा देणे या उद्देशाने प्रशासनाने हा निर्णय घेतल्याचे मानले जात आहे. एकाच वेळी ३० अधिकाऱ्यांच्या बदल्यांमुळे पुणे ग्रामीण पोलीस दलात मोठी प्रशासकीय पुनर्रचना झाल्याची चर्चा सुरू आहे.

### बदली झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नावे

| पोलीस अधिकाऱ्याचे नाव, पद | कोठून (जुने ठिकाण) कुठे (नवे ठिकाण) |
|---|---|
| १. दत्तात्रय किसन गुंड, पोलीस निरीक्षक | नियंत्रण कक्ष ते जुन्नर पोलीस ठाणे |
| २. कुमार रामचंद्र कदम पोलीस निरीक्षक | सासवड पोलीस ठाणे ते रांजगणगाव एम.आय.डी.सी.पोलीस ठाणे |
| ३. चंद्रशेखर मोहनराव यादव पोलीस निरीक्षक | बारामती तालुका पोलीस ठाणे ते शिक्रापूर पोलीस ठाणे |
| ४. विनोद भगवान पाटील पोलीस निरीक्षक | नियंत्रण कक्ष ते शिरुर पोलीस ठाणे |
| ५. सचिन दिनकर पाटील पोलीस निरीक्षक | नियंत्रण कक्ष ते लोणावळा शहर पोलीस ठाणे |
| ६. राजेश नारायणराव रामाघरे पोलीस निरीक्षक | लोणावळा शहर पोलीस ठाणे ते हवेली पोलीस ठाणे |
| ७. संतोष वसंत तासगावकर पोलीस निरीक्षक | आर्थिक गुन्हे शाखा ते यवत पोलीस ठाणे |
| ८. हेमंत गणपत शेडगे पोलीस निरीक्षक | नियंत्रण कक्ष ते दौंड पोलीस ठाणे |
| ९. विजयमाला महादेव पवार पोलीस निरीक्षक | जिल्हा विशेष शाखा ते उरुळी कांचन पोलीस ठाणे |
| १०. संतोष शामराव जाधव पोलीस निरीक्षक | जिल्हा वाहतूक शाखा ते राजगड पोलीस ठाणे |
| ११. महादेव नारायण वाघमोडे पोलीस निरीक्षक | रांजणगाव एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे ते आर्थिक गुन्हे शाखा |
| १२. संदेश अरुण केंजळे पोलीस निरीक्षक | शिरुर पोलीस ठाणे ते आर्थिक गुन्हे शाखा |
| १३. वैशाली रावसाहेब पाटील पोलीस निरीक्षक | हवेली पोलीस ठाणे ते महिला कक्ष/भरोसा सेल |
| १४. नारायण शिवाजी देशमुख पोलीस निरीक्षक | यवत पोलीस ठाणे ते एफ.आर.ओ. पुणे ग्रामीण |
| १५. नागनाथ गुरुसिध्द पाटील सहा. पोलीस निरीक्षक | वडगाव निंबाळकर पोलीस ठाणे ते नियंत्रण कक्ष |
| १६. राजेश गणेश गवळी पोलीस निरीक्षक | राजगड पोलीस ठाणे ते अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभाग |
| १७. निलेश पांडुरंग माने पोलीस निरीक्षक | वाहतूक शाखा, बारामती विभाग ते भोर पोलीस ठाणे |
| १८. संतोष श्रीमत घोळवे पोलीस निरीक्षक | टी.एम.सी. ते सासवड पोलीस ठाणे |
| १९. रविंद्र दत्तात्रय पाटील पोलीस निरीक्षक | एफ.आर.ओ. ते जेजुरी पोलीस ठाणे |
| २०. दिपक भाऊसाहेब वाघचौरे सहा. पोलीस निरीक्षक | जेजुरी पोलीस ठाणे ते आर्थिक गुन्हे शाखा |
| २१. नारायण विनायकराव पवार पोलीस निरीक्षक | नियंत्रण कक्ष ते बारामती तालुका पोलीस ठाणे |
| २२. जिवन शांताराम मोहिते सहा. पोलीस निरीक्षक | इंदापूर पोलीस ठाणे ते वडगाव निंबाळकर पोलीस ठाणे |
| २३. सोमनाथ पांडुरंग शेंडगे सहा. पोलीस निरीक्षक | नियंत्रण कक्ष ते भिगवण पोलीस ठाणे |
| २४. कुलदिप दत्तात्रय सकपाळ सहा. पोलीस निरीक्षक | स्थानिक गुन्हे शाखा ते माळेगाव पोलीस ठाणे |
| २५. महेश नामदेव मेश्राम पोलीस निरीक्षक | सुरक्षा शाखा ते सायबर पोलीस ठाणे |
| २६. गोपाळ बासू पवार पोलीस निरीक्षक | दौंड पोलीस ठाणे ते जिल्हा वाहतूक शाखा |
| २७. महेश रामेश्वर स्वामी पोलीस निरीक्षक | नियंत्रण कक्ष ते वाहतूक शाखा, बारामती विभाग |
| २८. दिपरतन गोरख गायकवाड पोलीस निरीक्षक | शिक्रापूर पोलीस ठाणे ते जिल्हा विशेष शाखा |
| २९. विनोद जगन्नाथ महांगडे सहा. पोलीस निरीक्षक | भिगवण पोलीस ठाणे ते आर्थिक गुन्हे शाखा |
| ३०. विकास जगन्नाथ भुजबळ पोलीस निरीक्षक | नियंत्रण कक्ष ते सुरक्षा शाखा, पुणे ग्रामीण |

# वसई-नालासोपाराकरांचा प्रवास होणार वेगवान

**■ वसई (सुचिता देशमुख) :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) भाईंदर ते विरार या मेट्रो १३ मार्गिकेचा सुधारित आराखडा अंतिम मंजुरीसाठी राज्य सरकारकडे सादर केला आहे. या नव्या आराखड्यानुसार वसई ते नालासोपारा दरम्यान ३.२५ किलोमीटर अंतराचा मेट्रो मार्ग भुयारी स्वरूपात विकसित करण्यात येणार आहे. एकूण २४.९० किलोमीटर लांबीच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामध्ये २१.६५ किलोमीटर उन्नत (एलिव्हेटेड) मार्ग आणि ३.२५ किलोमीटर भूमिगत (अंडरग्राउंड) मार्गाचा समावेश आहे. या मार्गिकेवर एकूण १७ स्थानके प्रस्तावित असून त्यापैकी १४ स्थानके उन्नत तर ३ स्थानके भुयारी असतील. वसई ते नालासोपारा या विभागातील व्हीव्हीएमसी फायर ब्रिगेड, अचोळे गाव आणि नालासोपारा पश्चिम ही तीन स्थानके भूमिगत असणार आहेत. या बदलामुळे दाट लोकवस्तीच्या परिसरात मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पाचे आणखी एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे नायगाव खाडीवर उभारण्यात येणारा दुमजली पूल. या पुलाच्या खालच्या स्तरावर सहा पदरी रस्ता तर वरच्या स्तरावर मेट्रो मार्गिका असणार आहे. त्यामुळे रस्ते आणि सार्वजनिक वाहतूक या दोन्ही सुविधांना एकाच पायाभूत संरचनेतून चालना मिळणार आहे. मेट्रो १३ मार्गिका कार्यान्वित झाल्यानंतर भाईंदर, वसई, नालासोपारा आणि विरार परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या या भागातील नागरिकांना रस्त्यांवरील वाढती वाहतूक कोंडी आणि उपनगरीय लोकल रेल्वेतील प्रचंड गर्दीचा सामना करावा लागतो. मेट्रो सुरू झाल्यानंतर प्रवास अधिक जलद, सुरक्षित, आरामदायी आणि वेळेची बचत करणारा ठरणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे मुंबई महानगर प्रदेशातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होऊन परिसराच्या सर्वांगीण विकासालाही गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### मेट्रो १३ मार्गिकेची प्रस्तावित १७ स्थानके:

१. वसई-विरार महापालिका अग्निशमन केंद्र
२. अचोळे गाव
३. नालासोपारा पश्चिम
४. सुभाषचंद्र मैदान (भाईंदर)
५. नायगाव
६. छत्रपती शिवाजी महाराज चौक
७. जुचंद्र
८. राजवली
९. गोलाणी नाका
१०. वसई
११. नालासोपारा पूर्व
१२. मोरया नगर
१३. यशवंत नगर
१४. विरार
१५. विवा कॉलेज
१६. याझू पार्क
१७. डोंगरपाडा